


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ | अंक : १ | सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ ते रविवार दि. १९ जानेवारी २०२५ | पाने : ८ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

## स्क्रिझोफेनियामुळे तिचे मातृत्व संवेदनाहिन ठरले पोटच्या पोराला आईनेच गळा दाबून ठार मारले

मुंबई/क्राईम रिपोर्टर

**माणसाला होणारे काही रोग असे असतात कि त्याची लागण झाल्यावर माणूस जिवंत जरी असला तरी त्याचे स्वतःवर नियंत्रण रहात नाही. त्यामुळे तो असून नसल्यासारखा असतो. स्क्रिझोफेनिया हा सुद्धा मेंदूशी संबंधित एक असा आजार आहे की त्याचा माणसाच्या शारीरिक आणि मानसिक संतुलनावर परिणाम होतो. कारण या आजारात मेंदूचे कार्यच काहीसे अनियंत्रित होते. त्यातून मग त्या माणसाचे विचार, स्मृती, संवेदना आणि वर्तन यात एक विचित्र असा बदल जाणवू लागतो. स्क्रिझोफेनिया झालेला माणूस भलेही सामान्य दिसत असला तरी प्रत्यक्षात त्याचे मन आणि भावना स्थिर नसतात. आपल्या आजूबाजूला काहीतरी आहे किंवा घडणार आहे असे विचार सतत त्याच्या मनात येत असतात. त्याच्या मनात एखादा विचार आला कि त्याच विचारात तो हरवून जातो. त्याला इतर कुठल्याही गोष्टीचे भान रहात नाही. मेंदूची क्रिया अनियंत्रित झाल्याने अशा माणसाच्या मनातील विचार कोणत्याही दिशेने भरकटले जातात. परिणामी अशा माणसाच्या हातून काहीही घडू शकते. अशा माणसाला झोप लागत नाही, डोक्यात सतत कोणते ना कोणते विचार सुरु असतात. ज्या गोष्टी प्रत्यक्षात नसतात त्याच गोष्टींचा अशा माणसाला सतत भास होत असतो. रात्रारंभ या मराठी सिनेमात स्क्रिझोफेनिया झालेल्या इसमाची कथा मोठ्या खुबीने पडद्यावर दाखवलेली आहे. स्क्रिझोफेनिया झालेल्या एका इसमाला सतत आपली मुले आपला खून करणार आहेत असे भास होत असतात. त्यामुळे त्या भासातून तो स्वतःला इतका असुरक्षित समजत असतो कि आपल्याला असलेला धोका कायमस्वरूपी संपवण्यासाठी तो आपल्या मुलाचा खून करतो. अशीच एक भयंकर घटना मुंबईच्या वांद्र्यात घडली आहे स्क्रिझोफेनिया झालेल्या एका उच्च शिक्षित महिलेने आपल्या १0 वर्षाच्या मुलाची मोबाईल चार्जरच्या वायरने गळा आवळून हत्या केली. या महिलेचा पती मंत्रालयात उच्च पदावर अधिकारी म्हणून कार्यरत आहे. मात्र या घटनेने त्याला जबरदस्त मानसिक धक्का बसला आहे. या प्रकरणी आरोपी महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**








वांद्रे येथे राहणाऱ्या एका महिलेने तिच्याच पोटच्या १० वर्षाच्या मुलाची गळा आवळून हत्या केली. वांद्रे येथील खेरवाडीमध्ये हा भयानक प्रकार घडला आहे. अभिलाषा औटी (वय ३६) असे महिलेचे नाव आहे. आई-वडील आपल्या मुलांसाठी, त्यांच्या रक्षणासाठी काहीही करू शकतात. पण काही वेळा हेच पालक मुलांसाठी घातक ठरू शकतात, अशीच एक धक्कादायक घटना मुंबईतील वांद्रे येथे घडली आहे. वांद्रे येथे राहणाऱ्या एका महिलेने तिच्याच पोटच्या १० वर्षाच्या मुलाची गळा आवळून हत्या केली. वांद्रे येथील खेरवाडीमध्ये हा भयानक प्रकार घडला आहे. अभिलाषा औटी ( वय ३६) असे महिलेचे नाव असून सर्वेश असे त्यांच्या मुलाचे नाव आहे. या घटनेमुळे प्रचंड खळबळ माजली असून पत्नीच्या या कृत्यामुळे आणि मुलाच्या मृत्यूमुळे सर्वेशचे वडील प्रचंड खचले आहेत. ते उप-सचिवपदी कार्यरत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. यामुळे वांद्रे येथे खेरवादी परिसरात खळबळ उडाली आहे. औटी कुटुंब हे वांद्रे पूर्वेला असणाऱ्या खेरवाडी परिसरातील वाय कॉलनीत राहते. सर्वेशचे वडील उप-सचिव आहेत. अभिलाषा औटी यांना स्क्रिझोफेनिया हा आजार आहे. त्यामध्ये एखादी व्यक्ती कधीकधी अतिआक्रमकपणे तर कधीअति प्रेमळ वागते. घटनेच्या दिवशी, गुरूवारी संध्याकाळी अभिलाषा व त्यांचा मुलगा सर्वेश दोघेच घरात होते. स्क्रिझोफेनियामुळे अभिलाशा यांची मानसिक स्थिती ठीक नव्हती. संध्याकाळी ७.00 च्या सुमारासा काही कारणावरून अभिलाषा यांचा रागाचा पारा चढला. त्याच रागाच्या भरात अभिलाषा यांनी सर्वेशला घराच्या बेडरूममध्ये खएचून नेलं, दाराला आतून कडी लावली. आणि एका वायरने सर्वेशचा गळा आवळला. या घटनेत सर्वेशचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी सर्वेशचे वडिल यांनी ...पान ६ वर

## संसाराचे वाटोळे पत्नीला असह्य झाले पतीला ठार मारून त्याचे चार तुकडे केले







चिक्कोडी/क्राईम रिपोर्टर

**माणसाच्या सहनशीलतेला मर्यादा असतात. त्यामुळे बाई असो कि पुरुष एकदा का त्याच्या सहनशीलतेचा कडेलोट झाला कि मग माणूस मागचा पुढचा विचार करीत नाही. त्याला फक्त सततच्या त्रासातून सुटका करून घ्यायची असते. त्यामुळे माणूस कोणत्याही थराला जातो. चिक्कोडी जवळच्या उमराणीमध्ये अशाच एका घटनेत पती सतत दारू पिऊन त्रास देत असे, चारित्र्यावर संशय घेत असे त्यामुळे चिडलेल्या पत्नीने त्याची दगडाने ठेचून हत्या केली आणि मृतदेहाचे ४ तुकडे केले. याप्रकरणी पोलिसांनी पत्नीला अटक केली आहे.**

चिक्कोडी जवळील उमराणी येथे श्रीमंत रामाप्पा इटनाळे हे आपल्या पत्नी आणि चार मुलासह राहयला आहेत. त्याच्या घरची परिस्थीती ही तशी बेताचीच असल्याने त्यांना मोलमजुरी करण्या शिवाय पर्याय नव्हता. ऊसाच्या हंगामात ते गावातीलच ऊस टोळीमध्ये ऊस तोडणीसाठी जात होते. तर इतर वेळी मिळेल ते काम करून आपला व आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत होते. श्रीमंत इटनाळे याचा विवाह गेल्या २५ वर्षापूर्वी इचलकरंजी येथील सावित्री हिच्याबरोबर समाजाच्या रितिरिवाजा नुसार झाला. सुरूवातीला या दोघांचा संसार सुखा समाधानाने चालू होता. या दाम्पत्यांना माया, सुष्टी, रोशनी आणि सुरज नावाचा मुलगा अशी चार अपत्ये झाली. संसाराचा राहट गाडा ओढीत असताना नवरा बायकोची ओढाताण होत होती. घरची परिस्थीती तशी बेताचीच असल्याने रोज मोलमजुरीला गेले तरच चुल पेटणार होती. त्याही परिस्थीतीत संसाराचा रहाट गाडा सावित्री या कसा तरी ओढीत होत्या. तर श्रीमंत हा रोज दारू पिऊन येवून घरात बायकोबरोबर भांडण काढून तिला मारहाण शिवी गाळ करीत होता. तिला परिस्थीतीची जाणीव असल्याने सुरूवातीला ती आपले माहेर इचलकरंजी येथील आपल्या आई वडिलाकडून आपल्या संसाराला लागेल ते आणत होती. त्यामुळे श्रीमंत याचा स्वभाव हा ऐतखाऊच झाला होता. तो हल्ली काही ही कामधंदा न करता सकाळ संध्याकाळ दारू पिऊन दारूच्या नशेत तर्र राहत होता. त्याला ना मुला बाळाचे पडले होते. ना संसाराचे पडले होते. त्याला कशाचीच फिकीर नव्हती. रात्र दिवस कामन करता झोपा काढणे एवढेच त्याला माहित होते. सावित्री ही नावाप्रमाणेच सावित्री होती. आई बापानी करून दिलेला नवरा कसा का असेना ...पान २ वर

## दिराने स्वतःच्या वहिनीलाच पटवले सख्ख्या भावालाच मार्गातून हटवले

नागपूर/क्राईम रिपोर्टर

**आजकाल समाजात व्यभिचार इतका बोकाळला आहे कि काही वासनांध आपल्या कुटुंबातील नात्यातील महिलांशीच अनैतिक संबंध ठेवतात. अशावेळी या संबंधात कुणाचा अडथळा येत असेल तर त्याचा जीव घ्यायलाही ते मागेपुढे पाहत नाहीत. नागपुरातील बुटीबोरी भागात दिराचे तिच्या वाहिनीशी अनैतिक संबंध होते. मात्र या संबंधात वहिनीच्या पतीचा म्हणजेच आरोपीच्या सख्ख्या भावाचा अडसर होता. त्यामुळे वहिनीशी असलेले अनैतिक संबंध कायम ठेवण्यासाठी भावानेच भावाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

वहिनीसोबत दीराचे सूत जुळले. त्याची कुणकुण मोठ्या भावाला लागली. प्रेमसंबंधात मोठा भाऊ अडसर ठरत होता. त्यामुळे वहिनीचे प्रेम मिळविण्यासाठी लहान भावाने मोठ्या भावाचा पुतण्याच्या मदतीने दगडाने ठेचून खून केला. मृतदेह जंगलात फेकून पळ काढला. मात्र, बुटीबोरी पोलिसांनी मोठ्या शिताफीने हत्याकांडाचा छडा लावून दोघांनाही अटक केली. चंद्रकांत असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पंकेश आणि बंटी अशी आरोपींची नावे आहेत. चंद्रकांत (४०) हा जामठ्यात शेतमजुरी करायचा. त्याला पत्नी व एक मुलगा बंटी आहे. त्याच्या घराशेजारी त्याचा चुलत भाऊ पंकेश (३०) राहतो. चंद्रकांतला दारुचे व्यसन होते. तो घरातही पत्नी व ...पान ६ वर

## दारूच्या नशेत जेवणावरून त्यांनी राडा केला हॉटेल कर्मचाऱ्यांच्या मारहाणीत पर्यटक मेला







गोवा/क्राईम रिपोर्टर


**गोव्यातील कलगुट बीच हा पर्यटनासाठी एक पर्वणी आहे. त्यामुळे तिथे येणारे पर्यटक तिथे अक्षरशः जिवाची मजा करतात. त्या बीचवर केवळ गोवा आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातून पर्यटक येतात. थर्टी फर्स्टच्या निमित्ताने यंदा कलगुट बीचवर गर्दी उसळली होती. आंध्र मधून आलेले भोला राजा आणि त्याचे मित्र शेक हॉटेलमध्ये थांबले होते. त्यांनी जेवायची ऑर्डर दिली. त्यातील काही पदार्थ त्यानं मिळाले, पण नंतर मात्र किचन बंद झाल्याने त्यांनी पुन्हा मागवलेले पदार्थ मिळाले नाहीत. त्यामुळे त्यांनी हॉटेल मालक आणि तिथल्या कर्मचाऱ्यांशी वाद घातला. वाद इतका चिघळला कि हाणामारी सुरु झाली. या हाणामारीत हॉटेल मालक त्याचा मुलगा आणि हॉटेल कर्मचाऱ्यांनी भोला राजा आणि त्याच्या मित्रांना इतका चोप दिला कि त्यात भोला राजाचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी ही नववर्षाच्या स्वागताला गोव्यात पर्यटकांची मंदियाळी असल्याने गोव्यातील समुद्र किनारे आणि बीचेचस गर्दीने फुल्ल झालेली होती. देशातील पर्यटक ही आलेले होते. आंध्र प्रदेशातील भोला रवी तेजा आणि त्याचे मित्र ही गोव्यात नववर्षाच्या स्वागताला आलेले होते. दि.३० डिसेंबर २०२४ रोजी ते गोव्यात आले. गोव्यात येऊन मद्याचा महापुरात ते सकाळ पासून संध्याकाळ पर्यत ते रंगात आलेले होते. कळंगुट समुद्र किनाऱ्यावर आग्नेल सिल्वेरा याचे शॅक (हॉटेल) हे गेल्या वीस पंचवीस वर्षापासून आहे. कळगुंट बीच वर हॉटेल असल्याने सकाळ पासून संध्याकाळपर्यत रात्री पर्यटकांची जेवणासाठी आणि पिण्यासाठी गर्दी ही असायची. आग्ननेल सिल्वेरा याचेबरोबर त्याचा मुलगा शुबर्ट सिल्वेरा आणि नेपाळचे ...पान २ वर

## दिनेशची चुगली करून दादा ठाकूर चुकला विनाकारण आपल्या जीवाला मुकला









जळगाव/क्राईम रिपोर्टर

**कुणी चुगली केली तर त्याला सोडत नाहीत. चोपडा तालुक्यातील विरवाडे गावात राहणारा दिनेश कोळी हा मित्रांच्या सोबत लपून छपून दारूची पार्टी करायचा हि गोष्ट गावातल्याच दादा ठाकूर यांनी दिनेशच्या काकांना सांगितली. त्यामुळे दिनेश भयंकर चिडला आणि त्याने आपल्या मित्रांच्या मदतीने दादा ठाकूर याला इतके मारले कि त्यात दादाचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीन अटक केली आहे.**

पुर्वीच्या काळी मुलांना त्यांच्या आई-वडीलांचा व घरातील थोरा मोठ्यांचा मोठ्या प्रमाणात धाक असायचा. आपल्या हातून काही चुक झाली आणि ती घरातील मोठ्या व्यक्तींना समजली तर आपली खरडपट्टी होईल व प्रसंगी मार बसेल या भीतीनेच मुले गर्भगळीत होतअसत. घरातील मोठ्या सदस्यांसमोर लहान मुले थरथर कापत असत. मुलांकडून झालेली लहान-मोठी चुक घरातील ...पान २ वर

## संशयाच्या आजाराने झाला होता बेजार देवरूशी काकीला पुतण्यानेच केले ठार

जमखंडी (कर्नाटक)/क्राईम रिपोर्टर



मयत मंदा

**अंगात येणे हि एक प्रकारची अंधश्रद्धा आहे, पण ग्रामीण भागात अंगात येणाऱ्या माणसावर लोकांची श्रद्धा असते. लोक आपल्या समस्या घेवून त्याच्याकडे जातात. जमखंडी येथील शोभा मांग या महिलेच्याही अंगात यायचे, त्यामुळे लोक तिच्याकडे जायचे. तिच्यामुळे काही लोकांना गुणही यायचा. पण तिच्या नात्यातील तिचा पुतण्या भिमाप्पाला मात्र तिचा गुण येत नव्हता. उलट त्याच्या कुटुंबाची स्थिती आणखी बिघडली होती. याबाबत त्याने दुसऱ्या देवरूशाला विचारले असता तुझ्या कुटुंबातील लोकांनीच तुझ्यावर करणी केल्याचे त्याला सांगण्यात आले. त्यामुळे आपल्यावर देवरूशी असलेल्या काकीनेच करणी केली असा भिमाप्पाला संशय आला आणि याच संशयातून त्याने काकीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी भिमाप्पाला अटक केली आहे.**



करणी, धरणी, भानामती हा सगळा अंधविश्वास असला तरी बऱ्याच जणांना यावर अजून ही विश्वास आहे. म्हणून अनेकजण यावर उपाय शोधण्यासाठी मांत्रिक किंवा देवर्षी करणाऱ्याकडे जात असतात. यात कोणाला गुण येतो तर कोणाला नाही. गुण आला तर फारसा पडत नाही, परंतु गुण न आल्यास त्या देवर्षी करणाऱ्या व्यक्तीला दोष देऊन त्यालाच मारहाण करण्याचा प्रकार हा सर्रास घडत असतो. मुतूर गावात शोभा मांग या देवर्षी करतात हे आसपासच्या लोकांना माहित होते. त्याच्या अंगात रेणुका ...पान २ वर

## चारित्र्याच्या संशयाने घात झाला अखेर पतीने पत्नीचा खून केला

नागपुर/क्राईम रिपोर्टर

**अनैतिक संबंध फार काळ लपून रहात नाहीत. ते कधी ना कधी उघडकीस येतात. पण काही लोक विनाकारण आपल्या पत्नीवर संशय घेतात आणि याच संशयातून संसारात वादळ निर्माण होते. या वादळात अखेर कोणाचा ना कोणाचा बळी जातो. नागपुरात अशाच एका घटनेत सुरज पाटील नावाच्या इसमाचा त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता आणि याच संशयातून त्याने पत्नीची हत्या केली आणि पत्नीचा तिसऱ्या मजल्यावरून पडून अपघाती मृत्यू झाल्याचा बनाव केला, पण पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पाडला आणि त्याला अटक केली.**

पत्नी अचानक घरातून बाहेर पडली. पतीला पत्नी दुसऱ्या कुणाशी प्रेमसंबंध असल्याचा आला संशय. काही वेळानंतर पत्नी घरी परतली. दोघांमध्ये टोकाचे भांडण, पतीला झाला राग अनावर अन् पत्नीच्या डोक्यात वार करून केली हत्या. ही धक्कादायक घटना नागपुरात घडलीय. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झालंय. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आणि गुन्हा लपवण्यासाठी पतीने पुरेपूर प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी केलेल्या तपासात पतीनेच अनैतिक संबंधाच्या संशयावरून पत्नीची हत्या केल्याची माहिती समोर आलीय. नागपुरातील हुडकेश्वर परिसरात एक ...पान ६ वर

## दोघांमधील प्रापंचिक वाद भयंकर पेटला संशयी पतीने अखेर पत्नीचा जीव घेतला



मयत मंदा

अहिल्यानगर/क्राईम रिपोर्टर

**चारित्र्याच्या संशयावरून आजकाल पती पत्नीमध्ये बेबनाव होऊ लागलाय, त्यातून एकतर घटस्फोट होतात किंवा मग पती पत्नी एकमेकांच्या जीवर उठतात. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील वाघुली येथे असेच झाले. चारित्र्याच्या संशयावरून नारायण चव्हाण नेहमी आपल्या पत्नीचा छळ करायचा. त्यामुळे ती माहेरी जायची त्यानंतर नारायण कशीतरी तिची मनधरणी करून पत्नीला घरी आणायचा हे आता नित्याचे झाले होते. पण यावेळी मात्र ती सासरी यायला तयार नव्हती. त्यामुळे नारायणने आपल्या आईला आणि भावाला मांडला फोन करून तिची समजूत काढून परत बोलवायला सांगितले. मात्र ती परत येताच तो पुन्हा तिला मारहाण करू लागला आणि एकेदिवशी त्याने तिचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी नारायणसह त्याच्या आई भाऊ यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.**

पुणे जिल्ह्यातील वाघोली हवेली येथे रहाणाऱ्या विमल दादाराव जाधव व दादाराव आनंदा जाधव या दाम्पत्याला मुलगा भाऊसाहेब (वय २८) आणि पाच मुली आहेत. या सर्वाची लग्ने झाली असून त्या आपापल्या सासरी नांदत आहेत. भाऊसाहेब जाधव हा त्याच्या कुटुंबासोबत वाघोली येथेच रहातो. दादारावांची एक मुलगी मंदा हिचे लग्न १४ वर्षापूर्वी नेवासा तालुक्यातील सोनई येथील नारायण बाजीराव चव्हाण यांच्याशी झाले ...पान ६ वर



आरोपी हरिभाऊ



आरोपी नारायण

पान १ वरून...

## संसाराचे वाटोळे पत्नीला असह्य...

म्हणून ती मुलाबाळांच्याकडे बघून संसार करीत होती.त्यातच ती सकाळी कामाला गेली आणि संध्याकाळी कामावरून घरी परत यायला उशिरा झाला की श्रीमंत हा तिच्या चारित्र्यावर संशय ही घेत होता. त्यामुळे त्याच्या भांडणात आणखीन जास्त फोडणी पडत होती. मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घरातील खर्च याचा ताळमेळ बसत नव्हता. श्रीमंत याची कमाई ही काहीच नव्हती. तो तिच्या मते नवरा म्हणण्याच्या लायकीचा नव्हता. खायला कार आणि धरणीला भार असा तो होता. तुझ्या माहेरकडून हे आण जा. ते आण जा. मला काही सांगायचे नाही असा तगादा तो तिच्या मागे लावत होता. त्यामुळे ती वैतागलेली होती. दोघांचे ही भांडण हातघाईवर आले की, ती ही त्याला उलट शिव्या देत हातात सापडेल त्या वस्तुने मारहाण करीत होती. त्यामुळे त्याचे भांडण सोडवायला कुणी जात नव्हते. शेजाऱ्याच्या दृष्टीने त्याचे भांडण म्हणजे रोजचाच तमाशा झाला होता. त्यातच श्रीमंत याने ऊस तोड टोळीकडच्या मुकादमाकडून आपल्या अंगावर लाख रूपये घेतलेले होते. दारू पिऊन तो ऊस तोडीला जात नसल्याने मुकादम हा त्याच्याकडे पैसे परत मागत होता. त्याला तो काही ही कारण सांगून परत पाठवित होता. दारूची नशा करी जीवनाची दुर्दशा असे असले तरी काही अट्टल पिंडके इतके दारूच्या आहरी जात असतात की, त्यांना एक दिवस जरी दारू प्यायला मिळाली नाही तर त्याचे हात थरथरतात तसे श्रीमंत याचे झाले होते. तो काही कामधंदा करीत नसल्याने त्याच्याकडे दारू पिण्यासाठी ही पैसे नसायचे त्यावेळी तो बायको सावित्रीकडून दारूसाठी पैसे मागायचा. तिने त्याला त्यासाठी पैसे दिले नाही तर तो तिला घाण घाण शिव्या घालत मारहाण करायचा. त्यातच तो तिच्याकडून हिसकावून पैसे घ्यायचा. त्यामुळे तिच्या ही हातात काही पैसे उरत नव्हते. त्यातच त्याने अलिकडे तिच्या मागे वेगळाच तगादा लावला होता. त्याला एक मोटार सायकल पाहिजे होती. त्यासाठी तो तिच्या नावे असणारा गावातील प्लॉट विक असे मागे लागला होता. एकदा का प्लॉट विकला की त्याचे पैसे हातो हात संपणार हे तिला माहित होते. त्यामुळे ती त्याला तुम्ही आधी काही तरी कामधंदा करा मग मोटार सायकलीचा विचार करा असे सांगत होती. बायको मोटार सायकलीला ही पैसे देत नाही, आणि दारूला ही पैसे देत नाही म्हणून तो तिच्यावर चिडत होता. हल्ली तो जास्तच तिला मारहाण करून त्रास देत असल्याने तिने आपल्या माहेरच्या लोकांना उमराणी येथे बोलावून त्याला समज दयायला लावली होती. परंतु श्रीमंत हा काही एक ऐकण्याच्या तयारीत नव्हता. त्याला कोणत्याही परिस्थीत मोटार सायकल ही पाहिजेच होती. हल्ली मोटार सायकल घेणे ही फारसे काही अवघड नाही. परंतु त्याचे हप्ते आणि त्या गाडीचा खुराक कसा परवडायचा याचा ती विचार करीत होता.एक तर नवरा काही कामधंदा करीत नाही, गाडी घेतली की, त्याचा खर्च ही तिलाच करावा लागणार होता. म्हणून तीने मोटार सायकल घ्यायला विरोध केला होता. तिने मोटार सायकल घ्यायला विरोध केल्याने त्याच्या रागाचा पारा आणखीनच चढला होता. तो रोज दारू पिऊन येवून तिला मारहाण करू लागल्याने तिच्या ही डोक्यावरून पाणी जास्तच गेले होते. तो तिला एक तर पैसे दे नाही तर गाडी घेऊन दे म्हणून तिच्या मागे लागला असल्याने ती ही त्याला नको नको ते बोलत होती. दि.९ डिसेंबर २०२४ रोजी तो ऊस तोडणीसाठी जातो असे सांगून घरातून सकाळीच निघून गेला. परंतु तो त्या दिवशी रात्री उशिरा पर्यत घराकडे परत आला नाही.सवित्रीने ही त्याचा काही शोध घेतला नाही.दारू पिऊन कुठे तरी पडला असेल म्हणून ती ही गप्प राहिली होती. दुसऱ्या दिवशी उमराणी आणि इटनाळ गावच्या हद्दीतील एका शेतात शेतमालक गेले असताना त्यांना कुठून तरी दुर्गंधी येवू लागली. ते शेत मालक आपल्या शेतातील ऊस तोड करून कारखान्याला पाठवाचे म्हणून ऊसाची पाहणी करण्या करिता गेले होते. ऊस तोड दोन दिवसात करायची म्हणून ते ठिंबक सिंचन योजनेसाठी घातलेल्या डिप्र पाईप काढण्यासाठी ते सरीत पुढे गेले असताना त्यांना तुकडे तुकडे केलेला गावातीलच श्रीमंत इटनाळे याचा मृतदेह दिसून आला. त्यांनी या घटनेची माहिती उमराणी येथील गावातील लोकांना तसेच श्रीमंत इटनाळे याच्या घरातील लोकांना नातेवाईकांना दिली. ही माहिती मिळताच सावित्री आणि त्याचे नातेवाईक शेजारी आणि इतर लोक घटनास्थळी धावत आले. कुणी तरी या घटनेची माहिती चिक्कोडी पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून या घटनेची माहिती मयत श्रीमंत याच्या नातेवाईकाकडून घेतली. मयताचा आणि घटना स्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी चिक्कोड येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी चिक्कोडी डीवायएसपी गोपाळकृष्ण गौडर, सीपीआय विश्वनाथ चौगुले, चिक्कोडी पीएसआय बसगौडा यांनी पाहणी करून चिक्कोडी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. मयत श्रीमंत याचे कोणाशी वैर नव्हते. ना कोणाशी भांडण तंटा होता. तरी ही त्याचा खून कुणी इतक्या निर्दयीपणे केला असा प्रश्न पोलिसांना पडला होता. पोलीस पोस्ट मार्टमच्या प्रतिक्षेत असताना वेगवेगळ्या ॲगलने पोलीस तपास करीत होता. त्यांना कुठेच धागा दोरा सापडत नव्हता. घटना घडून तीन आठवडे झाले तरी संशयीत काही पोलीसांच्या हाती लागत नव्हता. या दरम्यान पोलिसांनी मयत श्रीमंत याची बायको सावित्री हिला वारंवार तपासासाठी बोलावून घेऊन तिच्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. ती पोलिसांना वेगवेगळी माहिती देऊन त्याची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असताना घटनेच्या दिवशी म्हणजे ९ डिसेंबर २०२४ रोजी श्रीमंत आणि सावित्री याचेत जोरदार भांडणे झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ती पोलिसांना वेगवगेळी माहिती देऊन त्याची दिशाभूल करीत असल्याचे पोलिसांच्या लक्षात आल्यावर दि.१ जानेवारी २०२५ रोजी तिला चिक्कोडी पोलीस स्टेशनला बोलावून घेऊन तिची झाडाझडती घेतली असता तिच्या संयमाचा बांध तुटला. तिने घडलेली सगळी हकीकत पोलिसांना सांगून पती श्रीमंत याचा खून आपणच केल्याचे पोलीसांना सांगितले. घटनेच्या दिवशी श्रीमंत हा दारू साठी आणि दुचाकीगाडीसाठी तिच्याकडे पैसे मागत होता. एकतर तिच्या नावे असलेल्या प्लॉट विक आणि मला पैसे दे असा त्याने तिच्या मागे तगादा लागल्याने दोघांत जोरदार भांडण जुपंले. तो दारूच्यानशेत तिला शिवीगाळ करीत मारहाण करू लागला होता. तिने त्याचा मार खाल्ला. परंतु ती आतून धुमुसत होती. तो दारूच्या नशेत एकटाच बाहेर झोपला होता. तिला मात्र झोप लागत नव्हती. तिच्या रागाचा पारा चढला होता. एकदाचे काय व्हयाचे ते होऊ दे म्हणत ती मध्यरात्री उठली. त्यावेळी रात्रीचे दोन वाजले होते. बाहेर दुरवर कुठेतरी कुंत्री भुकंत होती. तिने मागचा पुढचा विचार न करता बाहेर येऊन इकडे तिकडे पाहिले. बाजुलाच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि झोपलेल्या श्रीमंतच्या डोक्यात घातला. त्यावेळी त्याचे डोके फुटले. तिने त्याला ओरडण्याची ही संधी दिली नाही. परत तिने तो दगड उचलला आणि त्याच्या चेहऱ्यावर हाणला. त्यानंतर तिने शांत डोक्याने विचार करीत घरातून धारदार खुरपे आणले. रागाच्या भरात श्रीमंत याच्या मृतदेहाचे तीन चार तुकडे तुकडे केले. ते तुकडे एका लहान रिकाम्या बॅरेलमध्ये भरले आणि ते बॅरेल शेजारच्या ऊसाच्या शेतात ढकलत नेले. तेथे तिने त्या बॅरेलमधून त्याच्या मृतदेहाचे तुकडे परत बाहेर काढून विस्कटून टाकले. त्यानंतर तिने ते खुरपे आणि बॅरेल शेजारच्या विहिरित टाकले. घरी येऊन रक्ताचे डाग पुसून टाकून ती झोपली. दुसऱ्या दिवशी जणु काहीच झाले नाही अशा अविर्भावात ती वावरत होती. तिने असा कबुली जबाब दिलेला असला तरी एक वेळ ती नवऱ्याला मारू शकेल, पण त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून ते शेतात नेऊन टाकण्याचे काम ती एकटाने करू शकणार नाही असा प्रश्न पोलिसांना पडला होता. म्हणून ते तिच्याकडे वारंवार या कामात तुला कुणी दुसऱ्याने मदत केली काय? असे विचारत होते. परंतु तिने एकटानेच हा गुन्हा केल्याचे पोलिसांना सांगत असल्याने त्यांनी या घटनेची फिर्याद मयत श्रीमंत इटनाळे याच्या चुलत भावाकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून चिक्कोडी पोलिसांनी श्रीमंत रामाप्पा इटनाळे (वय ४०) रा.उमराणी याचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी त्याची बायको सावित्री श्रीमंत इटनाळे (वय ३४) रा.उमराणी हिच्या विरोधात आयपीसी कलम १०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करून तिला चिक्कोडी येथील प्रथम वर्ग न्यायालयात हजर केले. मा.न्यायालयाने सावित्री हिची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. दरम्यान तिने सांगितल्या प्रमाणे गुन्हयात वापरलेले खुरपे आणि बॅरेल त्या विहिरीतून बाहेर काढण्यात आले. या घटनेत अनेक प्रश्न निरूउत्तर असल्याने या घटनेचा पुढील चिक्कोडी पोलीस स्टेशनचे पीएसआय बसगौडा याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## दिनेशची चुगली करून दादा ठाकूर...

काही सदस्य मोठ्या व्यक्तींपर्यत पोहोचू देत नव्हते आणि मुलांचा बचाव करुन घेत त्यांना खालच्या पातळीवर समज देत परिस्थिती सांभाळून घेत होते. आजही ग्रामीण भागात अशी परिस्थिती कमी अधिक प्रमाणात कायम आहे. आज काळ बदलला आहे. घरातील कर्त्या व्यक्तींचा मुलांना कमी अधिक प्रमाणात धाक कायम असला तरी कित्येक मुले चोरुन लपून व्यसन करतात हे आजचे वास्तव आहे. याला कारण म्हणजे संगत गुण. संगत आणि पंगत घडल्याशिवाय साथीदाराचे गुण–अवगुण समजत नाही असे म्हटले जाते. गावातील एक तरुण त्याच्या मित्रांसोबत मद्याची पार्टी करतो याची माहिती त्याच्या काकांना देणाऱ्या तरुणाला सामुहीक मारहाण झाली. या जबर मारहाणीत माहिती देणाऱ्या तरुणाचा मृत्यु झाला. मारहाण करणाऱ्या तिघा मित्रांविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आणि ते गजाआड झाले. चोपडा तालुक्यातील विरवाडे या गावी हा प्रकार घडला आणि ऐन तारुण्यात उमेदीच्या काळात तिघांना गजाआड होण्याची वेळ आली. चोपडा तालुक्यातील विरवाडे या गावी दादा ठाकुर हा तिशीतील विवाहीत तरुण रहात होता. आई, पत्नी आणि बहिण अशांसह तो रहात होता. शेतमजुरी या परिवाराच्या उदरनिर्वाहाचे साधन होते. दादा ठाकुर याचे गावात काही तरुण मित्र होते. त्यापैकी दिनेश मधुकर कोळी, पिंटू उर्फ अरुण गोविंदा कोळी आणि शरद संतोष कोळी हे तिघे देखील मित्र होते. दिनेश कोळी याला अधुनमधून मद्यपान करण्याचे व्यसन होते. एखादा आनंदाचा प्रसंग साजरा करण्यासाठी तो मित्रांसोबत लपूनछपून मद्यपान करत असे. पिंटू बाहेर मद्यपान करतो हे त्याच्या घरी कुणाला माहिती नव्हते. त्याने तसे कुणाला समजू दिले नव्हते. तो मित्रांसोबत मद्यपान करतो हे केवळ त्याच्या जवळच्या निवडक मित्रांनाच माहिती होते. त्यापैकी दादा ठाकुर हा एक होता. नववर्षाच्या आगमनापुर्वी दिनेशने त्याच्या मित्रांना शेतात मद्यपानाची पार्टी दिली. त्यामधे दादा ठाकुर याच्यासह पिंटू कोळी आणि शरद कोळी यांचा समावेश होता. चौघा मित्रांनी मद्यपानाचा आस्वाद घेतला. मात्र पार्टी आटोपल्यानंतर दादा ठाकुरने दिनेशच्या काकांच्या कानावर हा प्रकार टाकला. आपला पुतण्या मद्यपान करतो, मित्रांना पार्टी देतो हे दिनेशच्या काकांना समजताच त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. दिनेश घरी येताच त्यांनी त्याला चांगले खडसावले. काकांचा राग बघून दिनेश त्यांच्यापुढे लटलट कापू लागला. काका घरातील मोठे असल्यामुळे दिनेश स्तब्ध उभा राहून त्यांचे खडे बोल ऐकत होता. काकांचे कडक शब्द ऐकुन घेण्याशिवाय त्याला काही गत्यंतरच नव्हते. आपण मद्यपान करतो आणि मित्रांना मद्यपानाची पार्टी देतो हे आपल्या काकांना कुणी सांगितले याचा शोध घेण्याचे दिनेशने मनाशी ठरवले. पार्टी आपण तिघांना दिली. त्या तिघांव्यतिरिक्त कुणीही काकांना माहिती देऊ शकत नाही हे दिनेशला माहिती होते. त्यामुळे आपल्यातील कुणीतरी ही माहिती काकांना सांगितली असा तर्क दिनेशने मनाशी लावला. त्याने बोलावताच एका शब्दावर पिंटू आणि शरद हे दोघे त्याच्यासमोर हजर झाले. मात्र दादा आला नाही. त्यामुळे दिनेशचा दादावर संशय बळावला. भेटण्यासाठी आलेल्या पिंटू आणि शरद या दोघांना दिनेशने विचारणा केली. दोघांनी त्याला स्पष्ट शब्दात ठामपणे सत्य प्रतिज्ञेवर कथन केले की आम्ही तुझ्या काकांना मद्यपानाच्या पार्टीचे काहीही सांगितलेले नाही. आपल्याजवळ आलेले पिंटू आणि शरद हे आपल्या जवळचे आणि विश्वासु असल्याची दिनेशची खात्री पटली. आता दादा हाच एकमेव माहिती लिक करणारा उमेदवार असल्याची दिनेशची खात्री पटली. दादा ठाकुर यानेच आपल्या काकांना आपले नाव सांगितल्याचा संशय दिनेशला आला. त्यामुळे दादावर दिनेशचा राग उफाळून आला. अंगात सळसळते तारुण्य असल्यामुळे दिनेशने दोघांच्या साथीने दादाला अद्दल घडवण्याचे ठरवले. २७ डिसेंबर २०२४ ची रात्र आणि २८ डिसेंबरचा दिवस दादा ठाकुरच्या जीवनातील अखेरचा दिवस ठरला. २७ डिसेंबरच्या सायंकाळी सात वाजता दिनेशच्या सांगण्यावरुन पिंटूने दादाचे घर गाठले. तु दिनेशच्या काकांना तो मित्रांना दारुची पार्टी देतो असे का सांगितले असा सवाल पिंटूने दादाला केला. मी दिनेशच्या काकांना काहीही सांगितले नाही असे भीत भीत दादाने घरी आलेल्या पिंटूला सांगितले. त्यावर पिंटूने दादाला म्हटले की दिनेशने तुला खरे खोटे करण्यासाठी बोलावले आहे. तु आत्ताच्या आता माझ्यासोबत चल असे म्हणत पिंटूने दादाला बळजबरी दिनेशजवळ नेले. विरवाडे गावातील बहिरम बाबा या ठिकाणी दिनेश आणि शरद हे दोघेजण हजर होते. त्याठिकाणी दिनेशने दादाला तु माझ्या काकांना मी मित्रांना दारुच्या पार्ट्या देतो असे का सांगितले असा प्रश्न केला. त्यावर अगोदरच घाबरलेल्या दादाने दिनेशला मी नाही सांगितले असे सांगितले. त्यावर दोघांमधे वाद वाढत गेला. भडकलेल्या दिनेशने संतापाच्या भरात दादाच्या डोक्यात बैलगाडीचे लाकडी शिंगाडे मारले. वजनदार लाकडी शिंगाड्याचा मार डोक्यात बसताच दादा भांबावला आणि जमीनीवर कोसळला. दरम्यान दिनेशची दादाला शिवीगाळ सुरुच होती. या कालावधीत दिनेशचे साथीदार पिंटू आणि शरद यांनी देखील दादाला मारहाण सुरुच ठेवली. जबर मारहाणीमुळे दादाला काहीही सुचत नव्हते. त्याच्या डोळ्यापुढे अंधारी आली होती. त्याचे डोके बधीर झाले होते. गावातील काही तरुणांनी त्याला हाताने पकडून घरी आणून सोडले. त्याला दरदरुन घाम येत होता. घाबरलेला दादा घरी येताच त्याची भयभीत अवस्था त्याच्या आईने आणि पत्नीने पाहीली. तो घरात येताच त्याच्या आईने पंखा लावला. त्याच्या आईने त्याची विचारपूस केली असता त्याने सर्व घटनाक्रम कथन केला. गावातील दिनेश मधुकर कोळी याने डोक्यात लाकडी शिंगाडे मारले असल्याचे त्याने आईला सांगितले. तसेच सर्वांनी मिळून आपल्याला मारहाण देखील केल्याचे त्याने सांगितले. डोक्यावर जबर मार बसल्यामुळे आपले डोके खुप दुखत असल्याचे त्याने सांगितले. मला दवाखान्यात घेऊन चला असे त्याने सांगितले. दरम्यान त्याच्या घराबाहेर मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. गर्दीतील कुणीतरी गाडी मागवली. सर्वाच्या मदतीने जबर जखमी आणि भांबावलेल्या दादाला गाडीत टाकून चोपडा येथे शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्याच्यावर वैद्यकीय उपचार केले. मात्र दादाची अवस्था बिकट झाली होती. त्यामुळे तेथील डॉक्टरांनी त्याला लागलीच जळगाव येथे शासकीय रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला. लागलीच दादाला जळगाव येथे दाखल करण्यात आले. त्याच्यावर उपचार करण्यात आले. मात्र दादाची अवस्था गंभीर असल्यामुळे त्याला संभाजीनगर येथे घाटी रुग्णालयात घेऊन जाण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र दादाची बिघडलेली अवस्था आणि संभाजीनगरला जाण्यास लागणारा वेळ लक्षात घेता त्याला जळगाव येथीलच खाजगी आयकॉन हॉस्पीटलमधे दाखल करण्यात आले. दादावर उपचार सुरु असतांना दुसऱ्या दिवशी २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास दादा ठाकुर याने अखेरचा श्वास घेतला. त्याची प्राणज्योत मालवली. त्याच्या मृतदेहावर शासकीय रुग्णालयात पोस्ट मॉर्टेम करण्यात आले. त्यानंतर त्याचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्यानंतर त्याच्यावर विरवाडे गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेप्रकरणी दादा ठाकुरची आई रुजबाई बारकु ठाकुर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चोपडा शहर पोलिस स्टेशनला दिनेश मधुकर कोळी, पिंटू ऊर्फ अरुण गोविंदा कोळीआणि शरद संतोष कोळी या तिघांविरुद्ध जीवे ठार मारल्याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.नं. ६३९/२०२४ भारतीय न्याय संहिता १०३(१)३(५) नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास डीवायएसपी अण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक मधुकर साळवे यांनी आपले सहकारी ज्ञानेश्वर जवागे यांनी सुरु केला. तिघा संशयीत मारेकऱ्यांना अटक करण्यात आली. या घटनेत दिनेशच्या काकांनी परिस्थिती थोडी संयमाने हाताळली असती आणि पुतण्या दिनेशला शांततेत समजावून सांगितले असते तर कदाचीत ही परिस्थिती उद्भवली नसती असे म्हटले जाते. याशिवाय दिनेश कोळी हा देखील तेवढाच जबाबदार म्हटला जातो. तारुण्याचा जोश मनुष्याला कशा प्रकारे संतापाच्या आहारी नेतो आणि एखादी अघटीत घटना घडते याचे हे एक उदाहरण म्हणता येईल. ऐन तारुण्याच्या आणि उमेदीच्या काळात तिघा तरुणांना गजाआड व्हावे लागले. ऐन तारुण्यात एक कमावता तरुण जीवानिशी गेला. त्यामुळे त्याची आई आणि पत्नी दोघींचा कमावता सहारा गेला. संयमाने परिस्थिती हाताळणे गरजेचे असते एवढेच या घटनेच्या निमीत्ताने सांगावेसे वाटते. राग आणि आग शांत झाल्यावरच कळते की नुकसान किती झाले.

## संशयाच्या आजाराने झाला होता...

देवी संचारते आणि त्या अंगात आल्यावर भक्ताच्या समस्यावर मार्ग सांगत असल्याने त्याच्याकडे अनेक अड्ल्या नडल्या लोकांची गर्दी ही आमवास्या, पौर्णिमेला होत असते. गावातील लोकांच्या बरोबर त्या बाहेर गावाहून आलेल्या लोकांना ही त्याच्या समस्येवर उपाय सांगून त्यांना मार्ग सांगत होत्या. आजच्या जगात समस्या नाही असा माणुस नाही माणुस नाही तेथे समस्या नाही असे म्हटले जाते. कोणाच्या घरात कुठली ईडा पिडा असते हे ज्याचे त्याला माहित असते. अगदी घरात सुख समाधान राहत नाही, सारखा अजारपणा, मुल होत नाही, तर कोण कर्जबाजारी असल्याने शोभा मांग याच्याकडे येत होते. तशा त्या देवर्षी नव्हत्या, पण त्याच्या अंगात देवी येत असल्याने अनेकजण त्यांना शोभा देवी, आई म्हणून बोलावित होते. अशातच त्याच्या घराशेजारी राहणारा त्याच्या भावकीतील भीमाप्पा मांग याच्या ही घरी काही तरी समस्या होती. तो ही नात्याने शोभा मांग याचा पुतण्या लागत होता. त्यामुळे त्याच्या घरातील समस्या ही शोभा मांग यांना चांगली माहित होती. तो त्यावर उपाय विचारायला त्यांना आला की, त्या त्याला त्या समस्यावर उपाय सांगत होत्या. आपल्या समस्यावर त्याने शोभा काकीकडून बऱ्याचवेळेला ते सांगतील तसे उपाय करून त्याने पाहिले होते. पण त्याला गुण काही लवकर येत नव्हता. तरी ही तो शोभा काकी सांगतील ते उपाय करीत होता. बऱ्याचवेळेला त्यांनी सांगून केलेला उपाय ही त्याला लागू पडत नसल्याने तो ही थकला होता. त्यातच त्याला अलिकडे वेगळीच शंका येत होती. कारण शोभा काकी या त्याला नात्याने काकी लागत असल्याने त्यातच त्याच्यात देवी येत असल्याने त्यांनीच उलट आपल्या घरावर करणी केली असेल असा संशय त्याला येत होता. त्यामुळे त्याने हल्ली त्याच्या कडे जाणे येणे सोडून दिले होते. बरेच दिवस महिना दोन महिना तो आपल्याकडे काही विचारायला आला नाही म्हणून शोभा मांग यांनी तु माझ्याकडे येण्याचे का बंद केलेस एवढेच त्याला विचारले. त्यावर काकी तुम्ही सांगितल्याप्रमाणे सगळे काही करून बसलो परंतु गुण काही येत नाही, मग मी काय करू असा प्रश्न त्याने कन्नडमध्ये त्यांना विचारला. आपण दिलेल्या उपायांनी गुण येत नसल्याचे ऐकून उलट शोभा मांग या त्याचेवर चिडल्या. तुझ्या घरातच दोष आहे आणि मला कशाला नावे ठेवतोस असे त्या त्याला म्हणाल्या. यावर त्या दोघांत त्यावेळी भांडण होऊन मोठा वाद विवाद झाला. काही झाले तरी भीमाप्पाला कोणत्यातच कामात यश येत नव्हते. घरात अजारपणाने कर्जबाजारी होण्याची वेळ त्याच्यावर आलेली होती. त्यामुळे आपल्यावर कुणी तरी करणी केली आहे आणि ती करणी आपल्या काकीनेच केली आहे असा संशय अलिकडे त्याला येवू लागला. त्यामुळे काकीकडे तो त्या संशयानेच पाहत होता. आपल्या काकीनेच आपले घर बरबाद करायचे ठरविले असेल आणि आपण त्याच्याकडेच उपाय मागायला जात असु तर ती चुक आपली आहे हे त्याच्या लक्षात आले. त्यातच त्याने आपल्याला होणाऱ्या त्रासाबद्दल घरातील समस्याबद्दल,आणि अजारपणाबद्दल दुसरीकडे चौकशी केली होती. त्याने ज्यावेळी दुसरीकडे चौकशी केली त्यावेळी त्या देवर्षीने भीमाप्पाला तुझ्यावर आणि तुझ्या घरावर दुसऱ्या तिसऱ्या कुणी करणी केली नाही तर ती करणी करणारी व्यक्ती ही तुमच्या भावकीतील महिलाच आहे, आणि ती करणी करणारी महिला ही मध्यम वयाची आणि करणी धरणी करणारी असून तिच्या अंगात देवी येत असल्याचे त्याला स्पष्टच सांगितले. यावर भीमाप्पाचा विश्वास बसला.त्याच्या मनातील शंका खरी ठरल्याचे त्याला वाटत होते.तो आता ती महिला कोण आहे हे चांगलेच ओळखून होता. त्या देवर्षीने सांगितल्याप्रमाणे शोभा काकी या त्याच्या नात्यातीलच होत्या. शिवाय त्याच्या अंगात देवीपण येत होती. तिनेच आपल्यावर घरावर करणी केली आहे याचा विश्वास त्याला पटला. आता त्याने याचा जाब काकी शोभा मांग यांना विचारण्याचे ठरविले. तो त्याच्याबरोबर भांडण काढण्याची संधी शोधत होता. त्याला माहित झाले होते की, शोभा याच्यामुळेच आपल्या घराचे वाटोळो होत आहे म्हणून तो त्याच्यावर चिडून होता. संधी शोधून तो त्याच्याबरोबर भांडण काढणार होता. शेवटी त्याला तशी संधी चालून आली. सोमवार दि.६ जानेवारी रोजी रात्री शोभा या घरी एकटयाच होत्या. तो ही त्यावेळी दारूच्या नशेत होता. त्याने त्यावेळी फुल्ल दारू पिलेली होती. नशेतच तो शोभा याच्या घरापुढे येऊन त्यांना कन्नडमध्ये अर्वाच्च भाषेत शिव्या देऊ लागला. त्या शिव्या ऐकून त्या ही तावातावाने घरातून बाहेर आल्या. त्या ही त्याला हातवारे करून तु येथे माझ्या घरासमोर उभे राहु नकोस असे सांगत त्या ही त्याला शिव्या देऊ लागल्या.दोघांची भांडणे वाढीस लागली होती. त्या त्याला शिव्या देत असताना भीमाप्पाला तिचा राग आला. माझ्या घरावर माझ्यावर करणी करून ही बाई माझ्यावरच शेखी करून माझी वाट लावण्याची भाषा करीत आहे हे बघून त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. त्याने रागाच्या भरात जवळच असणाऱ्या आपल्या घरात जावून काठी आणली. ती काठी त्याने शिव्या देणाऱ्या शोभा मांग याच्या डोक्यात दोन तीन वेळा जोरात हाणली. त्यासरशी त्या ओरडतच खाली पडल्या. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला. त्याच्या ओरडण्याने शेजारी ही जमा झाले होते. त्याच्या शेजारी राहणारे हे त्याच्या भावकीतील लोक असल्याने शोभा यांना मारहाण करणाऱ्या भीमाप्पाला त्यांनी आडविले. त्याच्या हातातील काठी त्यांनी हिसकावून घेतली. तोपर्यंत शोभा या रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडल्या होत्या.कुणी तरी या घटनेची माहिती त्याचा मुलगा रमेश मांग यांना फोन करून सांगितली. तो ही तातडीने घराकडे आला. त्याची आई शोभा मांग या रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे बघून तो ही शेजारी राहाणाऱ्या भीमाप्पाला मारायला गेला. परंतु शेजाऱ्यांनी त्याला आडवून गंभीर जखमी असलेल्या त्याच्या आईला उपचारासाठी दवाखान्यात नेण्यास सांगितले. रमेश याने दोघा तिघांच्या मदतीने जमखंडी येथे दवाखान्यात खाजगी वाहनाने उपचारासाठी नेले. परंतु तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून उपचारापूवीच त्याचा मृत्यु झाल्याचे सांगितले. या घटनेची माहिती रमेश मांग याने जमखंडी पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनानास्थळी दाखल झाले. घटनास्थळाची पाहणी करून त्याने घटनेचा पंचनामा केला. मयताचे शवविच्छेदन पोलीसांनी जमखंडी येथील सरकारी दवाखान्यात करण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी या घटनेची माहिती मयत शोभा मांग यांचा मुलगा रमेश मांग यांच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेनंतर पळून गेलेल्या भीमाप्पा मांग याचा शोध घेण्यास सुरूवात केली. घटनेनंतर पळून गेलेला भीमाप्पा मांग हा गावातील त्याच्या शेतात लपून बसल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी त्याला त्या शेतातून ताब्यात घेतले. त्याला जमखंडी पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता सुरूवातीला तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून मयत शोभा मांग यांनी त्याचेवर आणि त्याच्या घरावर करणी केल्याचा संशय त्याला असल्याने त्याने काठीने मारून त्याचा खून केल्याचे सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची फिर्याद पोलीसांनी मयत शोभा मांग याचा मुलगा रमेश मांग याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी शोभा परशुमराम मांग (वय ४५) रा.मुतूर जमखंडी याच्या खुन प्रकरणी भीमाप्पा मांग (वय २९) रा.मुतूर, जमखंडी याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला.त्याला जमखंडी येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी विजयपुर येथील जिल्हा कारागृहात केली.या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली काठी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास डीवायएपी शांतवीर ई याच्या मार्गदर्शनाखाली जमखंडी पोलीस करीत आहेत.

## दारूच्या नशेत जेवणावरून त्यांनी ...

दोन कामगार अनिल बिस्त व कमल सुतार असे मरीन शेख मध्ये असायचे. ३१ डिसेंबरमुळे गोव्यात नववर्ष साजरे करण्यासाठी पर्यटकांची गर्दी ही वाढलेली होती. त्यामुळे गेले दोन दिवस बुहतेक हॉटेल्स आणि बार फुल्ल झालेले होते. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांनी मिळेल त्या हॉटेलमध्ये, लॉजमध्ये आपआपली सोय केलेली दिसत होते. गोव्यात बाहेरून येणारे पर्यटक हे तेथे दंगा मस्ती आणि जीवाचा गोवा करण्यासाठी येत असल्याने ते मस्तपैकी खात पित असतात. आंध्र प्रदेशातून भोला रवी तेजा आणि त्याचे मित्र हे गोव्यात ऍन्जाय करण्यासाठी आलेले असल्याने दोन दिवस ते दारूच्या नशेतच होते. एखाद्याच्या अंगात दारू भिणली की, तो शेळीचा वाघ बनून समोरच्याला गुर्र गुर्र करू लागतो तसेच भोला रवी तेजा याचे झालेले होते. त्याच्या अंगात दारू भिनली असल्याने तो कोणाला ही कसे ही बोलत होता. एक तर त्याची भाषा ही तेलगु असल्याने तो तुटक फुटक हिंदीतून आणि इंग्रजीतून बोलत होता. ३० आणि ३१ डिसेंबरला तो आणि त्याच्या मित्राने भरपुर बिअर आणि दारू ढोसली होती. दोन दिवस त्याच्या अंगात दारूच असल्याने त्यांना कशाचेच ही भान नव्हते. तो आणि त्याच्या मित्रांनी दोन दिवस गोव्यात मस्त मजा केली होती. ३१ ची नाईट पार्टी करून ते परत आंध्र येथे आपल्या गावी जाणार होते. म्हणून ते ३१ला दुपारी ३च्या दरम्यान दक्षिण गोवा करून उत्तर गोव्यात आलेले होते. कळगुंट बीचवर येऊन त्यांनी परत दारू आपल्या घशाखाली रिचवली होती.दारूच्या नशेतच त्यांनी परत दुपारी ४ च्या दरम्यान ३१ ची मजा लुटून कळगुंट बीचवरील मरीन शॅकमध्ये आले. तेथे आल्यावर त्यांनी जेवणाची ऑर्डर दिली. त्यावेळी तेथे असणाऱ्या नेपाळी कामगारांनी त्यांनी दिलेल्या ऑडरी प्रमाणे त्यांना जेवण दिले. दुपारच्यावेळेच्या जेवणाचे किचन ते रोजच्या प्रमाणे ५.०० वाजता बंद करणार होते. भोला रवी तेजा यांनी दिलेली जेवणाची ऑर्डर ही त्याची शेवटची होती. किचन बंद करण्याची वेळ झाल्याने त्यातच आज ३१ डिसेंबर असल्याने त्यांना आज संध्याकाळी लवकरच किचन सुरू करण्याचे असल्याने अनिल बिस्ता आणि कमल सुतार यांनी किचन बंद करण्याचे ठरविले. भोला रवी तेजा आणि त्याचे मित्र जेवण करीत असताना त्यांनी परत दुसऱ्या खाद्यपदार्थाची ऑर्डर दिली. त्यावेळी किचन बंद करून अनिल बिस्ता आणि कमल सुतार हे शॅकच्या मागील बाजुस असणाऱ्या आपल्या खोलीत झोपायला गेलेले होते. त्यामुळे मालक आग्नेल सिल्वेरा यांनी भोला रवी तेजा आणि त्याच्या मित्रांना तुम्ही दिलेल्या खादय पदार्थाची ऑर्डर आपण पुर्ण करू शकत नसल्याचे त्यांना सांगितले. त्यामुळे भोल रवी तेजा आणि त्याच्या मित्रांना हॉटेल मालकाचा राग आला.ते त्याच्यासोबत वाद घालू लागले. ते पाच जण दारूच्या नशेत असल्याने मालक आग्नेल सिल्वेरा यांना शिवीगाळ करीत धक्का बुक्की करण्याचा प्रयत्न करीत असताना सिल्वेरा याचां मुलगा शुबर्ट तेथे आला. त्याने आपल्या वडिलांना धक्काबुक्की का करत आहात असे इंग्रजीत त्यांना विचारले. त्यावेळी भोला रवी तेजा आणि त्याच्या मित्रांनी शुबर्ट सिल्वेरा याला ही धक्काबुक्की केली. बघता बघता हा वाद विकोपला गेला. हॉटेलच्या मागील खोलीत झोपायल गेलेले अनिल बिस्ता आणि कमल सुतार हे दोघे ही शॅकधील होणारा आवाज ऐकून तेथे आले. दारूच्या नशेत पर्यटक गोंधळ करीत असतात हे हॉटेल मालक आणि कामगारांना नवीन नव्हते. बऱ्याच वर्ष ते हॉटेलचा धंदा करीत असल्याने त्यांना याचा अनुभव होता. दोघे ही कामगार तेथे आल्यावर वाद पुन्हा चिघळला. अनिल बिस्ता आणि कमल सुतार यांनी भोला रवी तेजा आणि त्याच्या मित्रांना समजावण्याचा प्रयत्न केला.परंतु ते काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. ते हॉटेल मालक आणि कामगारांना शिवीगाळ करीत त्यांना मारण्यासाठी त्याच्या अंगावर जात होते.हे बघून अनिल बिस्ता आणि कमल सुतार यांनी हॉटेलातील लाकडी दांडाका घेऊन भोला रवी तेजा आणि त्याच्या मित्रांना बडता बडवायला सुरूवात केली. त्याचेवळी सिल्वेरा पिता पुत्रांनी ही त्यांना मारहाण करीत धु धुण्याचा प्रयत्न केला. भोला रवी तेजा आणि त्याचे मित्र हे ते चौघे मारहाण करीत असताना पळून जाऊ लागले. परंतु अनिल बिस्ता आणि कमल सुतार याच्या तावडीत पळून जाताना भोला रवी तेजा हा त्याच्या तावडीत सापडला. त्याला लाकडी दांडक्याने अनिल बिस्ता, कमल सुतार आणि सिल्वेरा पिता पुत्रांनी त्याच्या डोक्यावर लाकडी दांडक्याने जोरदार प्रहार केला. त्यासरशी भोला रवी तेजा याचे डोके फुटले. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तो जागेवर बेशुद्ध गंभीर रित्या जखमी होऊन पडला. पर्यटकांना मारहाण होत असताना कळगुंट बीचवर एकच गोंधळ उडाला. भोला रवी तेजाला मारहाण करून तेथून सिल्वेरा पिता पुत्र आणि अनिल बिस्ता आणि कमल सुतार हे पळून गेले. ते गेल्यानंतर तेथे भोलाचे पळून गेलेले मित्र तेथे आले. त्यांनी तेथील लोकांच्या मदतीने जखमी अवस्थेत असलेल्या भोला याला जवळच्या कांदोळी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु तेथे दाखल करण्यापूर्वीच आणि उपचाराआधीच भोला रवी तेजा याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी मयत भोला याच्या मित्रांना सांगितले. त्याच्या मित्रांनी या घटनेची माहिती कळगुंट पोलिसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने कांदोळी येथील सरकारी रुग्णालयात पोहचले. त्यांनी तेथे मयत भोला रवी तेजा याच्या मित्राकडून माहिती घेऊन कळगुंट बीचवरील मरीन शॅक गाठले. घटनास्थळाचा पंचनामा करून संशयीतांचा शोध घेण्यास सुरूवात केली. तर मयताचे शवविच्छेदन कांदोळी येथील करण्यात आले. संशयीत आरोपी हे घटनास्थळावरून पळून गेल्याने पोलीसांनी त्याचा शोध सुरू केला. घटनेनंतर काही तासातच पोलिसांना मरीन शॅकच्या मागील बाजुस झोपलेल्या अनिल बिस्ता आणि कमल सुतार यांना ताब्यात घेतले. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती देवून मालक आग्नेल सिल्वेरा आणि त्याचा मुलगा शुबर्ट सिल्वेरा याची नावे सांगून आणि ते कुठे आहेत ते पोलीसांना सांगितले. त्या दोघांनी दिलेल्या माहिती नुसार पोलीसांनी आग्नेल सिल्वेरा आणि शुबर्ट सिल्वेरा यांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची लेखी फिर्याद मयत भोला रवी तेजा याचा मित्र स्पदंन भोलू रा.हैद्राबाद या मित्राने कळगुंट पोलिसात दिली. त्याच्या फिर्यादीनुसार पोलीसांनी भोला रवी तेजा (३०) रा.आंध्र प्रदेश याच्या खून प्रकरणी मरीन शॅकचे मालक आग्नेल सिल्वेरा (६४) त्यांचा मुलगा शुबर्ट सिल्वेरा (२३) रा.दोघे ही गोवा अनिल बिस्ता (२४) कमल सुतार (२३) रा.नेपाळ सध्या कळगुंट गोवा याच्या विरोधात भा.दं.वी कलम १०३/१०८ ३२४ प्रमाणे गुन्हा दाखल करून आग्नेल सिल्वेरा, शुबर्ट सिल्वेरा, अनिल बिस्ता, कमल सुतार यांना म्हपसा येथील कोर्टात हजर केले. मा.कोर्टाने या चौघांची रवानगी जेल मध्ये केली. या घटनेचा तपास उत्तर गोवा पोलीस अधिक्षक अक्षत कौशल, उपधिक्षक विश्वेश कर्पे, याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक परेश नाईक यांनी केला.

क्राईम संध्या Reporter

क्राईम संध्या सामाहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.

9890718873

क्राईम संध्या सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ ते रविवार दि. १९ जानेवारी २०२५ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com ३

# बनावट आयकर अधिकाऱ्याकडून ४० हून अधिक लोकांची फसवणूक

## ● फसवणूक करून दोन कोटी कमावले ● आरोपीकडून शेकडो ओळखपत्रे आणि शिक्के जप्त






**नालासोपारा/प्रतिनिधी**

बीकेसी आयकर विभागात काम करणारा कंत्राटी चालकच बनावट आयकर अधिकारी म्हणून वावरत होता. या बनावट आयकर अधिकाऱ्याला मंगळवारी गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांनी तळोज्यातून अटक केली आहे. आरोपीकडे अनेक आयकार्ड, बनावट शिक्के, नियुक्तीपत्रे व इतर कागदपत्रे सापडली आहेत. या आरोपीने किती लोकांना आयकर विभागात नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली आहे याचा तपास सुरू असल्याची माहिती गुन्हे विभागाचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. तसेच आरोपीला वसई न्यायालयात हजर केल्यावर ५ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले. संतोष भवनच्या तांडापाडा येथील अजमेरी बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या सफारुद्दीन खान (४९) यांच्या मुलीला आयकर विभागाची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून १५ लाख रुपयांची फसवणूक केली होती. आरोपी रिंकू शर्मा व अंशु पासी या दोघांनी त्यांच्या मुलीला आयकर विभागात कामाला लावतो असे सांगितले होते. त्यांच्या मुलीला आयकर विभागाचे ओळखपत्र व ट्रेनिंगचे पत्र देऊन तिला नोकरीला न लावता आर्थिक फसवणूक केली होती. पेल्हार पोलिसांनी १३ डिसेंबरला गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार करत होते. तपासादरम्यान रिंकू शर्मा (३३) हा आरोपी तळोज्यात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट तीनला मिळाली. आरोपीला पोलिसांनी मंगळवारी सापळा लावून ताब्यात घेतले. त्याची झडती घेतल्यावर २८ बनावट आयकर विभागाचे आयकार्ड, अनेक शिक्के, नियुक्तीपत्रे व इतर कागदपत्रे सापडली. आरोपी पकडल्याची माहिती मिळताच फसवणूक झालेल्या लोकांनी गुन्हे शाखेच्या कार्यालयात गर्दी केली होती. आतापर्यंत ४० ते ४२ नागरिकांसह सुशिक्षित बेरोजगार तरुण, तरुणींना बनावट आयकर निरीक्षकाचे आयकार्ड व नियुक्ती पत्रे देऊन दोन करोड पेक्षा अधिक रुपयांना गंडा घातला असल्याचे प्रथम दर्शनी पुढे आले आहे. आरोपीने अनेक वरिष्ठ आयकर अधिकाऱ्यांकडे कंत्राटी पद्धतीने चालक म्हणून काम केले असल्याने त्यांच्या व्हिजिटिंग कार्ड व फोटोसह कागदपत्रांचा गैरवापर केला आहे. आरोपीकडे सीबीआय पोलीस कमिश्नर, वरिष्ठ आयकर अधिकारी असल्याचे आयकार्ड दाखवून लोकांना गंडा घातला आहे. आरोपी एका कारवर पिवळा अंबर दिवा लावून वसई विरार परिसरात फिरून २० ते २५ जणांची फसवणूक केली आहे.

# नगर भूमापनाचा वीज पुरवठा दुसऱ्यांना खंडित

## विज पुरवठ्या मागे वसई तहसील कार्यालयातील कर्मचारीही सामील?




**वसई/प्रतिनिधी**

वसई तालुक्यातील वसई तहसीलदार कार्यालयामधील नगर भूमापन कार्यालयाचा वीजपुरवठा अखेर महावितरण मार्फत दुसऱ्यांदा खंडित करण्यात आला.

अधिक माहितीनुसार वसई तहसीलदार कार्यालयातील वीज मीटर मधून बेकायदेशीर रित्या नगर भूमापन कार्यालयाने वीज पुरवठा घेतला होता याबाबत तहसीलदार कार्यालयाने सदर विभागास लेखी पत्र देऊन सदरचे कार्यालय स्थलांतर करण्यासाठी आदेश दिले होते तसेच बेकायदेशीरपणे घेतलेला वीज पुरवठा तात्काळ खंडित करण्याचे निर्देश दिले होते असे असतानाही, या दोन्ही आदेशांचे भंग करून सदर कार्यालय सुरू होते. तहसीलदार कार्यालयामध्ये तहसीलदार संवर्गाची तीन पदे कार्यरत आहेत. त्यांनाच बसण्याकरता जागा शिल्लक राहिलेली नाही. भूमी अभिलेख हे स्वतंत्र कार्यालय असून त्यांना त्यांची जागा आहे असे असतानाही या कार्यालयाचा नगर भूमापन विभाग तहसीलदार कार्यालयामध्ये मागील काही वर्षांपासून ठाण मांडून आहे. प्राप्त झालेल्या माहितीनुसार, या बेकायदेशीर वीज पुरवठ्यासाठी तहसील कार्यालयातील एका कर्मचाऱ्यास मासिक दोन हजार रुपये दिले जात असल्याचे काही कर्मचाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. तहसीलदार कार्यालयाचे थकीत वीज बिल सध्या चर्चेचा विषय ठरलेला असून, त्यातच नगर भूमापनाच्या अशा गैरकृत्यामुळे महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे सदर वीज खंडित करण्यासाठी मागणी करण्यात आली होती. सर्वसामान्य वीज ग्राहकास अशा स्वरूपाचा वीजपुरवठा दिल्यास त्याच्यावर फौजदारी कारवाई होते त्यामुळे नियमाला बगल देऊन सुरू असलेली प्रक्रिया तहसीलदार अविनाश कोष्टी यांच्या निदर्शनास आणल्यानंतर याबाबतचे आदेश निर्देश करण्यात आले होते.

# उल्हासनगरमध्ये चोरी झालेला ६५ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी मुळ मालकांना केला परत!




**उल्हासनगर/सुनील तांबे**

उल्हासनगर परिमंडळ चार पोलिसांनी गहाळ आणि चोरी झालेला ६५ लाखांचा मुद्देमाल मूळ मालकांना परत केला आहे. मुद्देमाल हस्तांतर कार्यक्रमात मूळ मालकांना परत करण्यात आला. रेझिंग-डे निमित्त उल्हासनगर परिमंडळ चार तर्फे कॅम्प-३ येथील सिंधू भवन येथे मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये परिमंडळ मधून नागरिकांचे चोरीला गेलेले २०० पेक्षा जास्त मोबाईल, सोन्याचे दागिने, तसेच वाहने असे एकूण ६५ लाखांचा मुद्देमाल पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांचे हस्ते मूळ मालकांना परत करण्यात आला, चोरीला गेलेला मुद्देमाल नागरिकांना मिळाल्यामुळे पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहे. यावेळी पोलीस उपायुक्त सचिन गोरे, सहायक पोलीस आयुक्त अमोल कोळी सहायक पोलीस आयुक्त शैलेश काळे तसेच परिमंडळ ४ मधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर अवताडे, विष्णू ताम्हणे, अनिल पडवळ, अनिल जगताप, रमेश पाटील, अनिल थोरवे, किरण बालवडकर तसेच पोलीस कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

# बदलापुरात रिक्षाची ५ रुपयांनी भाडेवाढ




**बदलापूर/सुनील तांबे**

बदलापुरातील हजारो रिक्षा चालकांनी अचानकपणे ५ रुपयाची भाडे वाढ केलीय. पेट्रोल आणि सीएनजीच्या किमतीत कोणतीही मोठी दरवाढ झालेले नसताना, रिक्षा चालकांनी भाडेवाढ करण्याचा का निर्णय कसा घेतला असा प्रश्न प्रवाशांना पडलाय. दरम्यान रिक्षा चालकांनी केलेली ही भाडेवाढ बेकायदेशीर असल्याचं आरटीओने स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून हे रिक्षा चालक प्रवाशांकडून ५ रुपये जास्तीचं भाडं आकारत आहेत. याआधी हे भाडं १५ रुपये होतं आता ते ५ रुपयांनी वाढून २० रुपये करण्यात आले आहे. दरम्यान रिक्षा संघटनांनी आणि रिक्षा चालकांनी कोणत्या नियमानुसार आणि कोणाच्या सांगण्यावरून ही भाडेवाढ केली. या संदर्भाची कल्याण आरटीओ कार्यालयात रिक्षा संघटनांना सादर करायला सांगण्यात आली त्यासाठी एक आठवड्याची मुदत रिक्षा संघटनांना देण्यात आलीय. तसेच बदलापुरातील कोणत्याही प्रवाशांने जास्तीचं भाडं देऊ नये आणि कोणी जबरदस्ती केल्यास त्याची आरटीओकडे तक्रार करावी कायदेशीर कारवाई केली जाईल असं स्पष्ट केले.

# खेळ भरारी क्रीडा महोत्सव २०२५चे पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

**औसा/प्रतिनिधी**

औसा येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित राजीव गांधी पॉलिटेक्निक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित खेळभरारी क्रीडा महोत्सव २०२५ अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वितरण सोहळ्या प्रसंगी प्रमुख पाहुणे सोनू डगवाले अध्यक्ष दिशा प्रतिष्ठान, निलेश राजमाने, अमोल पाटील, मुकेश बीदादा, संस्थेच्या उपाध्यक्ष जयदेव बावगे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे यांच्या शुभहस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.




आंतरशालीय कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल या क्रीडा स्पर्धेमध्ये १०४ संघानी सहभाग नोंदवला होता. १४ ते १६ या वयोगटात व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलीच्या गटातून प्रथम पारितोषिक महेश विद्यालय शिरूर ताजबंद 'बी' तसेच द्वितीय पारितोषिक महेश विद्यालय शिरूर ताजबंद 'ए' मुलाच्या गटातून प्रथम पारितोषिक महेश विद्यालय शिरूर ताजबंद तर द्वितीय पारितोषिक रेणुकादेवी आश्रमशाळा महापूर, खो-खो स्पर्धेतून मुलींच्या गटातून प्रथम पारितोषिक निळकंठेश्वर विद्यालय निवळी तर द्वितीय पारितोषिक जिल्हा परिषद प्रशाला खरोळा रेणापूर, स्पर्धेत मुलाच्या गटातून प्रथम पारितोषिक जिल्हा परिषद प्रशाला खरोळा तर द्वितीय पारितोषिक दयानंद विद्यालय बाबळगाव, कबड्डी स्पर्धेत मुलींच्या गटातून प्रथम पारितोषिक श्रीराम माध्यमिक विद्यालय रेणापुर तर द्वितीय पारितोषिक श्री श्री रविशंकर विद्यालय लातूर व मुलाच्या गटातून प्रथम पारितोषिक लालबहादूर शास्त्री विद्यालय उदगीर तर द्वितीय पारितोषिक श्री संत गोविंद स्मारक विद्यालय वांजरवाडा या विजेत्या संघांना प्रथम पारितोषिक ११ हजार रुपये तर द्वितीय पारितोषिक ७ हजार रुपये रोख रक्कम सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे, प्राचार्या योगिता बावगे, लातूर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी चे प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम,लातूर कॉलेज ऑफ प्रायव्हेट आयटीआयचे प्राचार्य माधव सोनवरे, लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग चे प्राचार्या रूपाली गिरी,लातूर कॉलेज ऑफ सायन्सचे प्रभारी प्राचार्य शुभम वैरागकर तसेच श्री वेताळेश्वर शिक्षण संकुल मधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# लातूर शहर महापालिकेने केले ५० कोटीचे कर संकलन

**लातूर/प्रतिनिधी**

कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने सन २०२४-२५ या वर्ष्याच्या सुरूवातीपासूनच १००% मालमत्ता कर वसुलीचे लक्ष्य ठेवून मालमत्ताधारकासाठी विविध उपक्रम राबविण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी प्रशासनास दिलेले होते.त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची व शास्ती माफीची योजना लागू करण्यात आली होती. तसेच लोक अदालत मधे सुद्धा प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यानंतर ही काही थकबाकीदार टैक्स भरत नसल्याचे निदर्शास आल्याने जप्ती, नळ खंडन आदी कार्यवाही करण्यात आले होते. परंतु पुन्हा एकदा शास्ती माफी लागू करावी असी मागणी आल्याने या वर्षातील शेवटची संधी म्हणून दिं.२५ डिसेंबर ते १० जानेवारी २०२५ पर्यंत व्याज/ शास्तीमध्ये ७५ टक्के सुट देण्याचा निर्णय मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी जाहीर केला आहे. या आर्थिक वर्षात ३५ हजार मालमत्ता धारकाकडून ५० कोटी चे कर संकलन हे अवघ्या काही महिन्यात करुन कर संलकन विभागातील वसुली लिपिक, पर्यवेक्षक, कर अधीक्षक, क्षेत्रीय अधिकारी यांनी दमदार कामगिरी केली आहे.तसेच ७५% शास्ती माफी दरम्यान मालमत्ताधारकांना कर भरणा करणे सुलभ व्हावे यादृष्टीकोणातून महानगरपालिकेमार्फत दिं.०९ व १० जानेवारी २०२५ रोजी शहराच्या विविध प्रभागात मालमत्ताकर वसूली कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील कॅम्प च्या पहिल्याच दिवशी एकूण ६० लक्ष चे कर वसुली झाली असून, उद्या ७५% शास्ती माफी चा शेवटचा दिवस असून यानंतर पुन्हा सुट लागू होणार नाही व धडक जप्ती मोहीम सुरु होणार आहे. तरी उर्वरित थकबाकीदार मालमत्ता धारकाणी सुट चा लाभ घेऊन टॅक्स भरुन शहर विकासात हातभार लावावा व जप्ती सारखी कटू कार्यवाही टाळावी असे आव्हान उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

# 'विद्यार्थी केंद्रबिंदू मानून ज्ञानदानाचे कार्य करावे'

**लातूर/प्रतिनिधी**

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून देशाला बलशाली बनवावे, असे आवाहन शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी केले. अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्यावतीने लातूर येथे आयोजित मुख्याध्यापकांच्या ६१व्या राज्यस्तरीय दोन दिवशीय शैक्षणिक संमेलनानिमित्त क्रीडा संकुल येथून लोकनेते विलासराव देशमुख नगरी, थोरमोटे लॉन्स, औसा रोड, लातूर या संमेलनस्थळापर्यंत शुक्रवारी सकाळी शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून आ. काळे बोलत होते. शोभायात्रेत शहरातील विविध शाळांमधील लेझीम पथक व स्काऊट व गाईडच्या पथकातील जवळपास दीड हजार विद्यार्थी विविध महापुरुषांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. यावेळी शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष सुधाकर तेलंग, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष रावसाहेब आवारे, राज्याध्यक्ष के. एस. डोमसे, संमेलनाध्यक्ष बाबूराव जाधव, कार्याध्यक्ष हणमंत साखरे, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश देशमुख आदींची उपस्थिती होती.

# थोडक्यात वृत्तांत

### १३ जानेवारीला विभागीय लोकशाही दिन

नवी मुंबई : कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोंकण विभागाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पलांडे यांनी कळविले आहे.

### बुधोडा शिवारातील एक हेकर ऊस जळून खाक

औसा : औसा येथील माजी नगराध्यक्ष सुरेश आप्पा कारंजे यांचे सुपुत्र सागर सुरेश आप्पा कारंजे यांच्या मौजे बुधडा येथील सर्वे नंबर ९६ मधील शेतातील एक एकर ऊस अचानक आग लागून जळून खाक झाला आहे. या घटनेचे वृत्त कळताच ग्राम महसूल अधिकारी भागवत सोनवते यांनी शेतात जाऊन घटनास्थळाचा व झालेल्या नुकसानीचे पाहणी करून पंचनामा केला. उद्योजक तथा प्रगतिशील शेतकरी सागर कारंजे यांच्या शेतातील ऊस जळाल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान जळीत उसाचा पंचनामा करताना कैलास आप्पाराव पाटील, सहदेव एकनाथ बनसोडे, जयराज लदे यांची उपस्थिती होती. शनिवार दिनांक ११ जानेवारी रोजी सकाळी ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून वरिष्ठाकडे रीतसर अहवाल सादर केला आहे

### १८ जानेवारीला इयत्ता सहावी प्रवेश परीक्षा

लातूर : लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालय येथील इयत्ता सहावीमधील ८० जागांच्या प्रवेशासाठी १८ जानेवारी २०२५ रोजी प्रवेश परीक्षा होणार आहे. लातूर जिल्ह्यातील ३६ परीक्षा केंद्रांवर ही प्रवेश परीक्षा होईल. प्रवेश परीक्षा लेखी स्वरूपाची असून या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र www.navodaya.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. परीक्षेवेळी या प्रवेशपत्राची प्रिंट घेऊन येणे आवश्यक आहे. प्रवेश पत्रावर दिलेल्या सर्व सूचनांचे विद्यार्थ्यांनी पालन करणे गरजेचे आहे. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेश पत्रावर दिलेल्या परीक्षा केंद्रावर १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे. याबाबत अधिक माहितीसाठी लातूर जवाहर नवोदय विद्यालय येथे सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जवाहर लातूर नवोदय विद्यालय प्रभारी प्राचार्य संजय बडवे यांनी केले आहे.

### लातूरमध्ये पार्किंगची सुविधा उपलब्ध

लातूर : लातूर शहरामध्ये वाहनांची संख्या वाढत असल्यामुळे व शहरामधील मुख्य बाजारपेठेमध्ये पार्कींगची व्यवस्थां नसल्यामुळे रस्त्यावर ट्राफीक वाढत आहे. त्यामुळे लातूर शहरातील नागरीकांना महानगरपालिका मालकीच्या जागेवर पार्कींगची व्यवस्था उपलब्ध करुन देणेचा निर्णय मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी घेतला आहे. त्यानुसार अण्णाभाऊ साठे चौक येथील मोकळी जागा, गांधी मार्केट सा.क्रं. ११२ येथील वाहनतळ जागा, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उडडाणपुला खालील मोकळी जागा, व स्व.विलासराव देशमुख मार्गावरील जागेवर वाहनतळ या ठिकाणी पार्किंगची सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या व सदरचे काम स्वाप्नील दिलीप कांबळे यांना देण्यात आले आहे. तरी शहरातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की आपले दुचाकी, चारचाकी वाहन वरील पार्कींगच्या ठिकाणी सशुल्क ठेवून महानगरपालिकेस सहकार्य करावे. तरी लातूर शहरातील सर्व नागरीकांना याव्दारे सूचित करण्यात येते की उपरोक्त ठिकाणी आपली वाहने पार्कींग करावीत.

### टोलनाक्यांवर 'फास्ट टॅग' अनिवार्य

मुंबई : राज्यातील पथकर वसुली नाक्यांवर १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांचा पथकर फास्ट-टॅगद्वारेच भरावा लागणार आहे. या निर्णयानुसार सध्याच्या सार्वजनिक खासगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. फास्ट टॅगच्या माध्यमातून पथकर वसुली झाल्यास पथकर वसुलीत अधिक सूसुत्रता, पारदर्शकता येणार आहे. पथकर नाक्यांवर वाहनांचा खोळंबा कमी होणार आहे. यातून वेळेची, इंधनाची बचत होणार आहे. फास्ट-टॅग शिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्ट - टॅग सुरु नसेल किंवा टॅगशिवाय वाहनाने फास्ट-टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे. राज्यात सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १३ आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ९ रस्ते प्रकल्पांवर पथकर वसुली सुरु आहे. या ठिकाणी तसेच भविष्यात पथकर वसुल करावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू राहणार आहे.

### चहाच्या कागदी कपावर बंदी घालण्याची मागणी

लातूर : चहाचे कागदी कप कर्करोगासारख्या गंभीर आजारांना कारणीभूत ठरत असून या कपावर तातडीने बंदी घालावी, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील यांच्या नेतृत्वात देण्यात आलेल्या या निवेदनात म्हटले आहे की चहासाठी कागदी कप तयार करताना त्यात बीपीए नावाच्या केमिकलचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.या कपात गरम चहा किंवा पाणी टाकल्यास कपाच्या आतील बाजूस असणारे मायक्रो प्लास्टिक वितळते. ते चहामध्ये मिसळते. चहासोबतच या मायक्रो प्लास्टिकचे लाखो कण पोटात जातात. त्यामुळे कर्करोगासारख्या दुर्धर आजाराला सामोरे जावे लागत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा कपावर बंदी घालावी.सर्व शासकीय कार्यालये, शाळा- महाविद्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, सार्वजनिक संस्था आदींना या संदर्भात आदेशित करून अशा कपामध्ये चहाची विक्री होत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ व प्रियंका आयरे यांनी हे निवेदन स्वीकारले.

# हिंदू राष्ट्राची पायाभरणी!

२१ ०४ साली या देशात भाजपची सत्ता आली आणि तेंव्हापासून प्रतिगामी शक्तींना एक बळ मिळाले.आणि जेंव्हा सरकार एका विशिष्ठ धर्माची पाठराखण करते, तेंव्हा त्या धर्मातील कट्टरपंथी मोकाट सुटतात आणि हे मोकाट सुटलेले कट्टरपंथी कोणत्याही देशाच्या धर्मनिरपेक्षतेसाठी अत्यंत धोकादायक असतात. कारण अशा लोकांना त्यांच्या धर्माची ध्येयधोरणे पुढे रेटायची असतात. जुनाट रूढी परंपरांना नव्याने उभारी द्यायची असते आणि ज्या सुधारणावादी लोकांना हा सगळा जातीयवाद मान्य नसतो. अशा लोकांसाठी शांततेने आणि सुरक्षिततेचे जगणे कठीण होते. सध्या भारतात हेच सुरू आहे.ज्याप्रमाणे पूर्वी इस्लामी कट्टरपंथी लोकांनी उच्छाद मांडून लोकांचे जगणे मुश्कील केले होते. त्याच प्रमाणे आज हिंदू कट्टरपंथीय लोकांना कट्टर हिंदुत्वाची पाळेमुळे इथे घट्ट रोवायची आहेत. त्यासाठी त्यांना भारताला हिंदू राष्ट्र बनवायचे आहे. अर्थात हिंदू राष्ट्राची संकल्पना हिंदुत्ववादी लोकांसाठी किती जरी गरजेची वाटत असली, तरी प्रत्यक्षात ती अमलात येणे केवळ कठीणच नव्हे तर अशक्यप्राय आहे.

कारण कट्टरपंथी लोकांच्या या हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेला इथल्या हिंदूयेतर लोकांचा तर विरोध आहेच, पण हिंदुमधील सुधारणावादी लोकांचाही विरोध आहे. हिंदू राष्ट्राच्या मुद्द्यावर हिंदुमधेच मतभेद आहेत. फूट आहे. तरीसुद्धा कट्टरपंथी हिंदुत्ववादी या देशातील दलित अल्पसंख्याक समाजाला भीती दाखवण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या धर्मा विरुद्ध, प्रार्थना स्थळावर अधिकार सांगून ती तोडण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. अर्थात या सर्व गोष्टींना सत्तेत बसलेल्या राजकीय लोकांचा पाठींबा आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. सतेतले लोक पाठीशी असेल तरी हिंदू राष्ट्राची संकलपना प्रत्यक्षात येऊ शकतं नाही. कारण या मुद्द्यावर हिंदूंची एकजूट नाही. त्यामुळे हिंदुत्ववादी एकाकी पडलेत.आणि याच कारणामुळे त्यांचा जळफळाट सुरू आहे आणि त्यातूनच सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करून, दलित मुस्लिमांना धमकवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. पण अशावेळी जर सरकार हेतुपुरसकर डोळेझाक करून हिनुत्ववादयांना पाठीशी घालणार असेल, तर हिंदू राष्ट्राला विरोध करणारे लोकसुद्धा रस्त्यावर उतरतील. कदाचित या लढ्यात विचारवंत आणि सुधारणावादी हिंदू आघाडीवर असतील. आणि जर असा लढा सुरू झाला आणि त्यातून कायदा व सुव्यवस्थेची स्थिती निर्माण झाली, तर त्याला पूर्णपणे राज्य आणि केंद्र सरकार जबाबदार असेल.कारण दुसऱ्याच्या धर्मा विरुद्ध गरळ ओकणारे भारतातीलच काही भागांना मिनी पाकिस्तान म्हणत आहेत. त्यामुळे कट्टरंथीय लोकांविषयी देशातील तमाम निधर्मी वादी लोकांच्या मनात संताप आहे.त्यांचे एवढेच म्हणणे आहे या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्व जाती धर्माच्या लोकांनी रक्त सांडले आहे. त्यामुळे या देशावर कुठल्याही एका धर्माच्या लोकांचा अधिकार असू शकत नाही. हा देश सर्व जाती धर्माच्या लोकांचा आहे. या देशात धार्मिक स्वातंत्र्य आहे याचा अर्थ कुठल्याही एका धर्माचे लोक दुसऱ्या धर्माची अवहेलना करू शकतात असे नाही.राहता राहिला सवाल हिंदु राष्ट्राचां! तर हिंदू धर्मात चातूर्वर्णची उतरंड आहे.म्हणजे सर्व अधिकार ब्राह्मण आणि छत्रियाना असणार. शुद्रानी फक्त त्यांची सेवा करायची आणि आयुष्यभर गुलाम म्हणून जगायचे. यासाठीच हिंदुराष्ट्र हवे आहे का? म्हणजे इथल्या गोरगरीब दलित मुस्लिमांना गुलामीतून गुलामी कडे ढकलण्यासाठी हिंदुराष्ट्र बंनवयचे आहे. पण ते कदापि शक्य होणार नाही. कारण कट्टरपंथी हिंदुपेक्षा धर्मनिरपेक्ष हिंदूंची संख्या अधिक आहे आणि त्यांना या देशातील सर्व हिंदूयेतर लोकांचा पाठिंबा आहे. अशावेळी काही मूठभर कट्टरपंथी लोकांमुळे या देशात यादवी झाली, तर ते औषधालाही शिल्लक राहणार नाहीत. त्यामुळे जे लोक हिंदू राष्ट्राचे स्वप्न पहात आहेत त्यांचे स्वप्न कदापि पूर्ण होणार नाही.

# उद्योगविषयक धोरणांमध्ये कालानुरूप बदल करावेत -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## उद्योग विभागाच्या १०० दिवसांच्या आराखड्याचे सादरीकरण



**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यात जास्तीत जास्त गुंतवणूक आणण्यासाठी ईज ऑफ डुइंग बिझनेसची प्रक्रिया आणखी उद्योगपूरक करावी. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील जागांचे वाटप करण्याची प्रक्रिया येत्या १०० दिवसात करावी. उद्योग विषयक धोरणांमध्ये कालानुरूप बदल करण्याची गरज असून त्यासंदर्भात तातडीने आराखडा तयार करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या आराखड्यासंदर्भात उद्योग विभागाचा आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कामगार मंत्री आकाश फुंडकर, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, इंद्रनील नाईक उपस्थित होते. उद्योग विभागाचे सचिव पी.अन्बलगन यांनी १०० दिवसात उद्योग विभागाकडून करण्यात येणाऱ्या कामासंदर्भात सादरीकरण केले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) सध्या ३ हजार ५०० एकर जमीन वाटपासाठी उपलब्ध असून नवीन १० हजार एक जमीन अधिग्रहणासाठी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ईज ऑफ डुइंग बिझनेस अंतर्गत मैत्री पोर्टल व उद्योग आयुक्तालयाचे पोर्टलवर एआय चॅटबॉट सुविधा देण्यात येणार आहे. तसेच शून्य प्रलंबितता धोरण अवलंबून मैत्री पोर्टलवर आणखी ५० सेवांचा समावेश करण्याची प्रक्रिया येत्या १०० दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे. उद्योग धोरण, इलेक्ट्रॉनिक धोरण, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, वस्त्रोद्योग धोरण व एमएसएमई धोरण या धोरणांमध्ये कालानुरुप बदल करण्याची आवश्यकता असून यासाठी मार्चपर्यंत प्रक्रिया सुरू करावी, असेही यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले. उद्योग व निर्यातीला चालना देण्यासाठी सर्व जिल्हानिहाय गुंतवणूक व निर्यात परिषदांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत दहा हजार नवउद्योजक तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नवउद्योजक तयार करतानाच तरुणांना अप्रेंटीशिप मिळावी, यासाठी कार्यक्रम तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे**

- तक्रार निवारणासाठी कक्ष तयार करणार
- दावोस गुंतवणूक परिषद २०२५ मध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक आणण्यावर भर
- गुंतवणूक प्रोत्साहन अनुदानाची रक्कम तातडीने वितरित करणार
- परकीय गुंतवणूक आणण्यासाठी पावले उचणार
- ऑरिक सिटी, दिघी पोर्ट व बिडकीन औद्योगिक शहरांमधील कामे तातडीने पूर्ण करणार
- जिल्ह्यांमध्ये उद्योग सेवा केंद्रांचे बळकटीकरणावर भर

यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते.

# आगामी शंभर दिवसात पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना प्राधान्य- मुख्यमंत्री

## गाळ काढण्याची कामे मार्च पूर्वी पूर्ण करावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील मृद व जलसंधारणांतर्गत माथा ते पायथा तत्त्वावर पाणलोटाचा विकास करावा तसेच जलयुक्त शिवार अभियान ३.०, तलाव दुरुस्ती योजना यासह विभागातंर्गत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमातंर्गत, आगामी शंभर दिवसात पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या. मंत्रालयात मृद व जलसंधारण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्य सचिव (वित्त) विभाग ओ.पी.गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना, आदर्शगाव योजना, नवीन जलसंधारण प्रकल्पांची उभारणी व प्रगतीपथावरील प्रकल्प, पूर्ण झालेले प्रकल्पांचे परीक्षण व दुरुस्ती, माजी मालगुजरी तलावांचे पुनरूज्जीवन व दुरुस्ती कार्यक्रम या योजनांमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेल्या कामांना गती द्यावी. भविष्यकालीन योजनांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करून त्याला मान्यता घ्यावी. राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यावर भर देवून त्यासाठी योग्य ते नियोजन करा, विभागातील प्रलंबित कामांचा जलद निपटारा करा, पदभरती, विभागातील उपलब्ध मनुष्यबळाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**गाळ काढण्याची कामे मार्च पूर्वी पूर्ण करावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यातील गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अंतर्गत धरणातील गाळ काढून तोच गाळ शेतीसाठी वापरण्याच्या कामांना प्राधान्य देवून मार्च पर्यत ही कामे तातडीने पूर्ण करावी. बऱ्याच ठिकाणी गाळ काढल्यानंतर धरणांची पाणी साठवण्याची क्षमता वाढत आहे तरी आतापासून ही कामे गतीने केल्यास मार्च अखेर मोठ्या प्रमाणात राज्यातील धरणातील गाळ काढण्याची कामे पूर्ण होतील अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्या.


# मुंबई महानगर क्षेत्रात केबल कार’ प्रकल्प राबविण्यासाठी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची तत्वतः मान्यता

**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबई महानगर क्षेत्रामध्ये भविष्यात ‘रोप वे’च्या माध्यमातून ‘केबल कार’ प्रकल्प राबवण्यास केंद्रीय वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी तत्वतः मान्यता दिली असून लवकरच या प्रकल्पाचे सर्वेक्षण करून विकास आराखडा (D.P.R.) तयार करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते, वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सर्व राज्यांच्या परिवहन मंत्र्यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकी दरम्यान परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केंद्रीय परिवहन मंत्री श्री. गडकरी यांची विशेष भेट घेऊन मुंबई महानगर क्षेत्रामध्ये केबल कार’ प्रकल्प राबवण्यासाठी केंद्र सरकार द्वारे पर्वतमाला परियोजना’ अंतर्गत सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) अथवा केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त आर्थिक भागिदारीने रोप वे’ विकसित करण्याच्या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मुंबईच्या एकूणच वाहतुकी संदर्भात प्रकल्प अहवाल सादर करताना विमानतळापासून उपनगरांमध्ये कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी कमीत कमी वेळ लागावा, अशा पद्धतीची एकत्रित वाहतूक व्यवस्था विकसित करण्याच्या प्रकल्पाचे देखील सर्वेक्षण करावे अशा सूचना दिल्या. परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी वेगवेगळ्या उपनगरांमधून कमीत कमी वेळात मुंबई विमानतळाला पोहोचता येईल असा एकत्रित वाहतूक आराखडा लवकरच सादर केला जाईल असे सांगितले.

दरम्यान, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या दृष्टीने या प्रकल्पाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पालघरपासून रायगड जिल्ह्यातील उरण-पेणपर्यत पसरलेल्या एकूण क्षेत्रामध्ये नागरिकरणाचा वेग वाढत आहे. रस्ते वाहतूक, रेल्वे, मेट्रो यासारख्या सार्वजनिक वाहतूक सेवेवर दिवसेंदिवस पडणारा ताण लक्षात घेता भविष्यात केबल कार सारखी हवाई सेवा विकसित होणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रकल्पाचे सर्वेक्षण करून विकास आराखडा (DPR) तयार करणे गरजेचे आहे.

# ड्रोन प्रणालीमुळे सागरी सुरक्षा होणार भक्कम -नितेश राणे




**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील सागरी क्षेत्रात होणारी अवैध मासेमारी तसेच घुसखोरी रोखण्यासाठी ड्रोनद्वारे देखरेख विशेष प्रणाली सुरु करण्यात आली आहे. या ड्रोन प्रणालीमुळे राज्यातील ७ जिल्ह्यातील ९ सागर किनाऱ्यांची सुरक्षा आणखी मजबूत होणार असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मत्स्य आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते ड्रोन देखरेख प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचा पहिला १०० दिवसांचा आराखडा तयार केला असल्याचे सांगून मंत्री नितेश राणे म्हणाले की, ड्रोन यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या ७२० किलोमिटर लांबीच्या सागरी किनाऱ्यावरून राज्याच्या १२ मैल सागरी हद्दीपर्यत बेकायदा मासेमारी करणाऱ्या अवैध नौकांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. अशा अनधिकृत नौकांची माहिती घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी ड्रोन वेब सोल्यूशन्स स्ट्रिमिंगचा पुरावा म्हणून वापर केला जाणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला चाप बसणार आहे. ड्रोन यंत्रणेमुळे राज्यातील सागरीक्षेत्र हे कॅमेऱ्याच्या नियंत्रणात येणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला आळा घालणे शक्य होणार आहे.

नितेश राणे म्हणाले, बाहेरून येणाऱ्या ट्रॉलर्स, मोठ्या बोटी, यामुळे स्थानिक मच्छीमारांचे मोठे नुकसान होते. स्थानिकाच्या उत्पन्नात घट होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होतो. त्यावर नियंत्रण मिळावे, जरब बसावी यासाठी आधुनिक तंत्र प्रणालीच्या माध्यमातून सकारात्मक पाऊल उचलण्याच्या दृष्टीने मत्स्य व्यवसाय विभागाने ड्रोन च्या माध्यमातून पहिले पाऊल टाकले आहे. ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार असल्याने सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वेग जास्त असल्याने एकाचवेळी अधिक क्षेत्र ड्रोनच्या देखरेखाली येणार आहे. एका दिवसात १२० सागरी मैलाचे सर्वेक्षण करण्यात येईल. तसेच एका दिवसात सहा तास सर्वेक्षण करणे बंधनकारक असेल. ड्रोनमधून प्राप्त झालेली माहिती संबंधित जिल्हा कार्यालयात उपलब्ध करून दिली जाईल. मेक इन इंडिया अंतर्गत हे ड्रोन विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून समुद्रात होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार असून अवैधरित्या मासेमारी करणाऱ्यावर कारवाई करून जास्तीत जास्त दंड आकारला जाणार आहे. या ड्रोनच्या माध्यमातून छायाचित्रे उपलब्ध होणार आहेत. हे सर्व पुरावे विभागास प्राप्त होऊन कारवाई करण्यास गती मिळणार असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले. केंद्र व राज्य सरकारच्या मत्स्य व्यवसाय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही मंत्री श्री.राणे यांनी सांगितले. समुद्रकिनारा लाभलेल्या राज्यापैकी ड्रोनद्वारे देखरेख प्रणाली विकसित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी ड्रोनद्वारे देखरेख प्रणालीचे प्रात्यक्षिक झाले. यासाठी मत्स्य आयुक्त कार्यालय येथे कंट्रोल रूम उभारण्यात आला आहे.

### ७ जिल्ह्यांतून होणार ९ ड्रोनचे उड्डाण

पालघर जिल्ह्यातील शिरगाव, ठाणे जिल्ह्यातील उत्तन, मुंबई उपनगर जिल्ह्यातील गोराई, मुंबई शहर जिल्ह्यामधील ससून गोदी, रायगड जिल्ह्यातील रेवदंडा, श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा, साखरी नाटे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या नऊ समुद्रकिनाऱ्यावरून ९ ड्रोन उडवले गेली. यावेळी आमदार मनीषा कायंदे, कृषी व पदुम विभागाचे सचिव रामास्वामी एन, मत्स्यव्यवसाय आयुक्त पंकज कुमार, सागरी सुरक्षा पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, मत्स्य व्यवसाय उपायुक्त दिपाली बनकर, यासह सात ठिकाणी उपस्थित असलेले मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# भाईंदर मधील बस आगार विकसित करण्यास १३६ कोटीचा खर्च अपेक्षित

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

भाईंदर पश्चिम येथील रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या जागेला विकसित करून त्या ठिकाणी बस आगार, उप- प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि मासळी बाजार उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या बाबतची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली असून यासाठी १३६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित करण्यात आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम येथे महापालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ३३८, ३३९ पै या आरक्षण क्र. ५७ (एस.टी स्टॅड व डेपो) चे आरक्षण असून सदर जागेचे एकूण क्षेत्र ४९०००.०० चौरस मीटर एवढे आहे. ही जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ताब्यात असून त्यातील बहुतांशी जागा कांदळवनाने व्यापलेली आहे.त्यामुळे यातील ताब्यात असलेल्या ७ हजार ४०० चौरस मीटर जागेत राज्य परिवहन



महामंडळाच्या बस गाड्या उभ्या करण्यासाठी आगार उभारण्याची मागणी विभागाकडे सातत्याने करण्यात येत होती. मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे एस.टी कार्यालय आणि बस आगाराची दुरवस्था झाली होती. दरम्यान शनिवारी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभागाचे आयुक्त विवेक भीमनवार,मिरा -भाईंदर महापालिकेचे आयुक्त संजय काटकर आणि एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर यांना सोबत घेऊन सदर जागेची पाहणी केली. त्यानंतर आयोजित केलेल्या प्रशासकीय बैठकीत ही जागा विकसित करण्याच्या सुचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. त्यानुसार परिवहन महामंडळाची ही जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मदतीने विकसित केली जाणार असून एस.टी महामंडळाच्या आणि पालिकेच्या इलेक्ट्रिक बस गाड्या उभ्या करण्यासाठी विशेष सोय केली जाणार आहे. भाईंदर रेल्वे स्थानकाजवळ बस आगारासाठी जागा आरक्षित करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाच्या नवीन एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीनुसार या जागेवर बांधकाम इमारत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.यात उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, वातानुकुलित मासळी बाजार आणि वाहनतळ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक असल्यामुळे हे काम शासन निधीतून केले जाणार आहे.तर यासाठी १३६ कोटी रुपयांचा निधी अपेक्षित करण्यात आला आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **अॅड.रूपेश शिंदे**. न्यायक्षत्र-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# तलासरी येथे भव्य शेतकरी मेळावा आणि प्रशिक्षण शिबिर संपन्न





**तलासरी/प्रतिनिधी**

तलासरी पंचायत समिती सभागृह येथे जिल्हा परिषद पालघर व पंचायत समिती तलासरी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य शेतकरी मेळावा व पशुपालक प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. जिल्हा परिषद पालघर कृषि व पशुसंवर्धन समिती सभापती संदिप पावडे यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. पंचायत समिती सदस्य राजेश खरपडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा परिषद सदस्य तथा कृषि समिती सदस्य विजय उराडे, जिल्हा परिषद सदस्य अनिल झिरवा, पंचायत समिती सदस्य भरत कडू, जयवंती गोरखना यांच्या उपस्थितीत शिबिर संपन्न झाले.

सभापती संदीप पावडे यांनी कृषिप्रधान देशाच्या शेतकरी राजाने कोरोना सारख्या जागतिक आजारामुळे देशातील सर्व जनतेला या कठीण प्रसंगी सर्वात जास्त मदत केली. हे शेतकरी व पशुपालक प्रशिक्षणाचे मेळावे सिमित न राहता ते व्यापक, ज्ञानवर्धक असले पाहिजेत. सर्व योजनांची माहिती ग्रामसभेमार्फत लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे, असे सांगून मेळाव्यास उपस्थित तालुका कृषि अधिकारी व कृषि अधिकारी यांना त्यांनी ग्रामसभांना आपले अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहुन योजनांची माहिती लोकांपर्यंत पोचविण्याची सूचना केली. विक्रमगड तालुक्यातील खोमारपाडा येथे सासणे येथे शेतकऱ्यांनी भातशेती व्यतिरिक्त गवार, कारले आदि पीके घेऊनहे शेतकरी प्रगतीकडे वाटचाल करत आहेत यांचे दाखले देऊन प्रशिक्षित होऊन शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी अत्याधुनिक शेतीकडे वळले पाहिजे. असेही त्यांनी सूचित केले. पंचायत समिती सदस्य राजेश खरपडे यांनी शेतकरी वर्गाला व्यवसायाकडे घेऊन जाण्याच्या उद्देशाने शासनाने हे शिबिराचे आयोजन केले आहे. कृषि व पशुसंवर्धन विभागांच्या मार्गदर्शनाने शेतकरी व पशुपालक यांनी ज्ञान आत्मसात करावा व जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी केले. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.प्रकाश हसनाळकर यांनी जिल्ह्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या योजना संबंधी माहितीपर मार्गदर्शन केले. विद्यमान कृषि व पशु संवर्धन समिती सभापती संदिप पावडे यांनी आपल्या कार्यकाळात योजनांचे परंपरागत सातत्य न ठेवता नाविन्यपुर्ण योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी आम्हा कृषि व पशुसंवर्धन विभागाच्या खातेप्रमुखांना प्रेरित केले. यातील काही योजना केवळ महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद पालघर ही अंमलात आणत आहे. असे प्रतिपादन केले. जिल्हा कृषि अधिकारी विश्वजीत माने यांनी योजना संबंधी विस्तृतपणे मार्गदर्शन करीत तीन प्रमुख घटकांच्या माध्यमाने योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत कसे पोहोचवितो हे सांगितले. शेतकऱ्यांनी उत्पन्नवाढ करून सामाजिक प्रगती साधावी याकरिता शेतकरी व पशुपालक याकरिता आम्ही सेवारत आहोत असे सांगितले. डॉ. भुवनेश्वर बोरकर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पालघर यांनी प्रशिक्षणाच्या माध्यमाने शिकणे गरजेचे आहे. अभ्यासू वृत्तीने आपल्याला उत्पन्न वाढीचा उद्देश साध्य करता येईल. मानवी जातीची सुरुवात कृषि व पशुसंवर्धनाच्या माध्यमाने झाली. उद्योजकता या उद्देशाने आपले ध्येय असले पाहिजे. उत्पादन वाढीबरोबर आपणास शेतमालाचा दर्जा सुधारला पाहिजे.

यामुळे शेतकऱ्याचा आर्थिक स्तर उंचावता येईल असे मार्गदर्शन केले. येथे उपस्थित स्थानिक आदिवासी तरुण पशुपालक अजित सुतार, मौजे करजगाव यांनी त्यांचा कुक्कुटपालन करून मोठ्या व्यवसाय निर्माण केल्याचा अनुभव सांगून आज त्यांच्याकडे १२ ते १३ जातीच्या कोंबड्या पाळलेल्या असून ते आज प्रगतिशील कुक्कुटपालन व्यवसायातून वार्षिक १५ ते १७ लाखाची उलाढालीत वाटचाल करीत असल्याचे अनुभवपर मार्गदर्शन उपस्थित शेतकरी व पशुपालक यांना केले. तदनंतर रवी सोनवाल मौजे तलासरी, वराहपालन स्थानिक तरुण उद्योजक यांनी कोणत्याही योजनेचा पाठबळ न घेता वराह पालनातून त्यांनी वार्षिक १८ ते २० लाखांची उलाढाल करीत वाटचाल करीत आहेत असे मार्गदर्शन केले. ह्या उद्योगाची सुरुवात त्यांनी अगदी भाड्याने जागा घेऊन केली. असे मार्गदर्शन करताना अनुभव कथन केला. मिरची लागवड याबाबत आशिष ठाकरे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. या मेळाव्यात शेतकरी व पशुपालक यांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शवून प्रशिक्षणाचा लाभ घेतला. स्थानिक तरुण आदिवासी कुक्कुटपालक उद्योजक अजित सुतार यांनी मेळाव्याच्या ठिकाणी आपले पक्षी प्रदर्शन भरविले होते. त्यास मान्यवरांनी भेट दिली व कुक्कुट उद्योजक अजित सुतार यांचा सपत्नीक सत्कार सभापती संदिप पावडे यांनी केला व त्यांच्या उद्योजकतेचे कौतुक केले. या मेळाव्यास, डॉक्टर सिद्धार्थ साबळे, सहाय्यक आयुक्त डहाणू, तालुका कृषि अधिकारी ईभाड, पंचायत समिती तलासरीचे कृषि अधिकारी तेजल गावित व पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती तलासरीचे डॉ. भूषण मयेकर, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.मंदार पटेल, सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नालासोपाऱ्यात परफ्यूमवरील तारखा बदलताना स्फोट, चार जण जखमी



**वसई/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्वेच्या शंकेश्वरनगर मधील एका इमारतीत परफ्युमवरील तारखा बदलण्याचे काम सुरू असताना स्फोट झाल्याची घटना घडली आहे. गुरुवारी रात्री पावणे नऊच्या सुमारास ही घटना घडली यात एकाच कुटुंबातील चार जण होरपळून जखमी झाले आहेत. नालासोपारा पूर्वेच्या शंकेश्वर नगर परीसर आहे. या ठिकाणी असलेल्या रोशनी अपार्टमेंट इमारतीत मधील ११२ क्रमांच्या सदनिकेत वडर कुटुंब राहते. गुरुवारी रात्रीच्या सुमारास परफ्युम बॉटल वरील तारखा संपल्या होत्या. त्या बदलण्याचे काम सुरू होते. याच दरम्यान अचानकपणे स्फोट झाला. परफ्युम मध्ये असलेल्या गॅसमुळे स्फोटात घरातील चार जण होरपळून जखमी झाले. यात महावीर वडर (४१), सुनीता वडर, हर्षवर्धन वडर (९), हर्षदा वडर (१४) अशी जखमींची नावे आहे. या घटनेची माहिती पालिकेच्या अग्निशमन विभागाला मिळताच घटनास्थळी पोहचून परिस्थिती नियंत्रणात आणली. तर जखमींना तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. मुलगा हर्षवर्धन याच्यावर नालासोपारा येथील लाईफ केयर रुग्णालय तर अन्य तीन जणांवर ओस्कर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# भिवंडीत वाचन संस्कृती वाढीसाठी लक्षवेधी ग्रंथ दिंडी



**भिवंडी/प्रतिनिधी**

पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचलित बी.एन.एन. महाविद्यालया च्या गुणवत्ता हमी कक्ष, मराठी विभाग आणि निरलॉन ग्रंथालय, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, मातोश्री उषाताई जाधव एम बी ए महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथदिंडीचे पूजन संस्थेचे कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे, प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य डॉ. सुवर्णा रावळ, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. शशिकांत म्हारुळकर यांच्या हस्ते करण्यात आले. निरलॉन ग्रंथालयापासून सुरू झालेली ग्रंथदिंडीची पालखी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री अण्णासाहेब जाधव यांच्या स्मारकापर्यत नेण्यात आली. त्यानंतर पुनःग्रंथालयाजवळ दिंडीची सांगता करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी ग्रंथ वाचनाच्या सवयी आणि वाचनाचे महत्त्व प्रतिबिंबित करणारे आणि प्रोत्साहन देणारे वेगवेगळे प्लेकार्ड तयार केले होते ते या दिंडीचे विशेष आकर्षण ठरले. दिंडीत विद्यार्थ्यांकडून ग्रंथ वाचनाच्या महत्त्वावर विविध घोषणा देण्यात आल्या. या ग्रंथ दिंडीचे आयोजन डॉ.अलका कदम, ग्रंथपाल माधव मुंडे यांनी केले. तर या ग्रंथदिंडीमध्ये महाविद्यालयाचे प्रबंधक नरेश शिरसाळे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.चंद्रकांत म्हात्रे, प्रा.पुंडलिक वारे, डॉ. रूपवते, डॉ. पाईकराव, प्रिया चव्हाण, पूजा जाधव तसेच प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मयोगी, विद्यार्थी सहभागी झाले होते.

# विरारमध्ये दिव्यांग क्रीडा स्पर्धा सुरू

**विरार/प्रतिनिधी**

वसई-विरार महानगरपालिका आणि पॅरालिम्पिक स्पोर्ट्स असोसिएशन, पालघर यांच्या सहकार्याने दोन दिवसीय जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा शुक्रवार व शनिवार अशा दोन दिवस होणार आहेत. जलतरण, बुद्धिबळ, कॅरम व बॅडमिंटन या स्पर्धा पहिल्या दिवशी विरार पश्चिमेकडील अमेया क्लासिक क्लब येथे तर विशेष मुलांच्या गटातील १०० मीटर धावणे, भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक या स्पर्धा विरार अग्निशमन केंद्रासमोरील म्हाडा मैदानात सुरु झाले. याच दिवशी अंध महिला व दिव्यांग महिलांचे क्रिकेटचे सामने म्हाडा मैदानात सुरु आहेत. दुसऱ्या दिवशी दिव्यांग गटातील स्पर्धकांच्या १०० मीटर धावणे, भालाफेक. गोळाफेक, थाळीफेक या स्पर्धा म्हाडा मैदानात सुरु झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन आज सकाळी अमेया क्लासिक क्लब येथे करण्यात आला. बक्षीस समारंभ शनिवारी होणार आहे.

# चैन स्नॅचिंग करणाऱ्या इराणी आरोपीला अटक, लाखोंचा मुद्देमाल हस्तगत



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी सह महाराष्ट्र तसेच इतर राज्यांमध्ये चैन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांमध्ये असलेला एक आंतर राज्य टोळीतील प्रमुख आरोपी यास शांतीनगर पोलिसांनी अटक केली असून त्याच्या जवळून एक लाख २२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे अशी माहिती शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. गुलामअली जाकीर जाफरी (२७), रा. पिराणीपाडा असे अटक आरोपीचे नाव आहे. शांतीनगर पोलिस ठाणे हद्दीत भादवड येथील स्वामी नारायण मंदिरात दर्शनासाठी मुंबई येथून आलेल्या सौ आरमुगकणी वेलराज नाडार या रिक्षाने जात असताना त्यांच्या गळ्यातील एका काळ्या रंगाच्या मोटार सायकलवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी महिलेच्या गळ्यातील ५ तोळे वजनाचे सोन्याची चैन खेचून पसार झाले होते. या गुन्ह्याचा तपास करताना परिसरातील सी सी टि व्ही तपासले असता त्यामध्ये संशयित आरोपी गुलामअली जाकीर जाफरी हा असल्याचे निष्पन्न झाले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक (प्रशासन) विनोद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, पोलीस हवालदार रिजवान सैय्यद, लक्ष्मण सहारे, मुके, प्रशांत बर्वे, दिपक सानप, भुषण पाटील, महिला पोलिस शिपाई आंधळे हे पथक शोध घेत असताना. संशयित आरोपी चोरलेली सोन्याची चैन तो विक्री साठी घेऊन निघाला असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिस पथकाने त्यास भादवड पाईपलाईन येथून बजाज कंपनीची पल्सर मोटार सायकल क्रमांक एम.एच. १२ व्ही. वाय. २९०३ सह ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे अर्धवट तुटलेली १४ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन मिळुन आली आहे.ही चोरी त्याने त्याचा आंबिवली येथील साथीदार सलमान सोबत केल्याचे कबूल केले.तर त्याच्या जवळ आढळून आलेली दुचाकी ही पुणे हडपसर येथून चोरी केल्याचे समजले.आरोपीस भिवंडी न्यायालयात हजर केले असता त्यास १३ जानेवारी पर्यंत पोलिस कोठडी ठोठावण्यात आली असून आरोपी यावर ठाणे मुंबई यांसह परराज्यात सुध्दा मोठ्या प्रमाणावर चैन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांची नोंद असून त्याचा तपास पोलीस करीत आहेत अशी माहिती शेवटी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली आहे.

# भिवंडीत भीषण आगीत चार ते पाच भंगार गोदाम जळून खाक



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी ग्रामीण भागातील गोदाम पट्ट्यातील आगीच्या घटना नियमित घडत असून अशाच एका आगीत चार ते पाच भंगार गोदाम जळून खाक झाली आहेत. ओळी ग्रामपंचायतीत मोकळ्या जागेत पत्र्याचे हे गोदाम असून येथे मोठ्या प्रमाणावर कागदी रोल साठवलेले होते, त्यासोबतच प्लास्टिक, कागदी पुठ्ठा या भंगार साहित्याची साठवणूक केली होती. शुक्रवारी दुपारी गोदामात लागलेली आग वाऱ्यामुळे सर्व पाच पत्र्याच्या गोदामात पसरली. त्यात कागदी रोल मोठ्या प्रमाणावर असल्याने या आगीत सर्व गोदाम जळून खाक झाले आहेत. या घटनेची माहिती भिवंडी अग्निशामक दलाला मिळताच एक गाडी घटनास्थळी दाखल होत त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान पाण्याच्या तुटवड्याने आग विझवण्यात अडचण येत होती.

# स्वयं सिध्दी महाविद्यालयात कला व क्रीडा स्पर्धेचे आयोजन




**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील टेमघर येथील स्वयं सिध्दी महाविद्यालयात या ठिकाणी रूपांतरण या अंतर महाविद्यालयीन कला व क्रीडा स्पर्धाचा शुभारंभ संस्थेचे विश्वस्त सीए सुरेश जैन यांच्या शुभहस्ते प्राचार्य शैलेश बोरकर, वरिष्ठ प्राध्यापक महेश सोनी, उप प्राचार्य डॉ. योगेश पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. रूपांतरण या स्पर्धेचे यंदा १५वे वर्ष असून या मध्ये फॅशन शो, नृत्य, नाटिका, रांगोळी, मेहंदी अशा कला स्पर्धासोबतच बॉक्स क्रिकेट, रस्सीखेच, व्हॉलीबॉल, बॅटमिंटन, खो-खो, कबड्डी या क्रीडा स्पर्धांचा समावेश होता. या स्पर्धामध्ये भिवंडी सोबतच ठाणे, कल्याण डोंबिवली, मुंबई या भागातील ३२ महाविद्यालयां मधील २८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीचे प्रमुख प्रा.रक्षा करवा, प्रा.अस्वद शेख व इतर प्राध्यापक विद्यार्थी यांनी विशेष अशी मेहनत घेतली.

# विरार येथील गीता ग्रंथालयातर्फे सामुहिक वाचन कार्यक्रम

**विरार/प्रतिनिधी**

विरार येथील गीता ग्रंथालयातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपामाअंतर्गत सामुहिक वाचन आणि ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ विक्री कार्यक्रम राबविण्यात आला. गीता ग्रंथालयाच्या अध्यक्षा सौ.छाया अजीव पाटील तसेच ज्योत्स्ना कदम, श्रीमती वैद्य, शेखर अभ्यंकर, आनंद पाटील, दशरथ पाटील, किशोरी पाटील, ग्रंथपाल मंगला खानिवडेकर, मानसी लाड, अनिता मिश्रा, बाल वाचक वेदांग वझे आदि उपस्थित होते.

यावेळी वाचनातील एकाग्रता साधता आली पाहिजे. अवती भोवती कितीही कोलाहल असला तरी वाचन गांभीर्याने व एकाग्रपणे झाले पाहिजे, असे शेखर अभ्यंकर यांनी सांगितले. साडे चार वर्ष वयाच्या चि. वेदांग वझे याने तोंडपाठ म्हणून दाखविलेल्या स्वातंत्र्य सेनांनी वि.दा.सावरकर यांचे स्वगत व लबाड कोल्ह्याची गोष्ट सांगून उत्तम मनोरंजन केले. दशरथ पाटील यांनी ग्रामीण लेखक आनंद यांची एक ग्रामीण कथा त्या पारंपारिक बोलीभाषेत सादर केली. हा सामुहिक वाचनाचा कार्याम ग्रंथालयाच्या अध्यक्षा छाया पाटील यांनी त्याचे आयोजन केले होते.

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'जी' वालीव, विभागीय कार्यालय जूचंद्र**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय जूचंद्र येथे झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय वालीव येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | जूचंद्र | JC01/1700/196 | क्रिष्णकां कमलाप्रसाद पटेल | नीरज ता. सिंह, संध्या नीरज सिंह |
| २. | जूचंद्र | JC01/1314/27 | कलीम अहम्मद हकीमउद्दीन शेख | मोहम्मद दिलशेर अली अहमदशिधकी |
| ३. | जूचंद्र | JC02/1775/159 | सईद मुश्ताक समीउल्लाह शबनम/ मुश्ताक सईद | कल्याण कुमार राय, पायल रॉय |
| ४. | जूचंद्र | JC03/1032/4 | हरिश्चंद्र सुदामा मौर्या | बबलु संजु रजत |
| ५. | जूचंद्र | JC02/1775/288 | शितल विलास सुकरू | दिनेश कुमार प्रकोत, लीना प्रकोत |
| ६. | जूचंद्र | JC02/1801/44 | बहादूर सिंग | सुशील रामधन राठोड राहुल / निमा रामधन राठोड/रामधन राठोड |
| ७. | जूचंद्र | JC02/906/18 | बदगुनिस्सा एमनईमखान | फिरदोस नईम खान |
| ८. | जूचंद्र | JC02/1773/88 | युवराज बाळकृष्ण किणी | गिरीश एम सिंह, रेश्मा गिरीश सिंह |
| ९. | जूचंद्र | JC02/592/37 | मुनिरा मुरतुजा साबुवाल | जयंत पुरुषोत्तम शिंदे, वासंती पुरुषोत्तम शिंदे |
| १०. | जूचंद्र | JC04/1242/125 | दिपक शंकरलाल अग्रवाल | गोपाल शंकरलाल अग्रवाल |
| ११. | जूचंद्र | JC03/721/5 | सिटीझन को.सो.हा.ऑप. | अनिता लाडक्या पागी |
| १२. | जूचंद्र | JC01/1194/425 | युनूस कमरुद्दीन शिकारी | गीता देवी/ नागेंद्र चंद्र देव राय |
| १३. | जूचंद्र | JC03/623/36 | एलायस डिसोजा | अनिता ईलायस डिसोजा |
| १४. | जूचंद्र | JC01/1100/20 | पुवनकुमार राजकिशोर सिंह | नीमा मोनू शर्मा |
| १५. | जूचंद्र | JC02/1752/295 | मोहनलाल जिवनलाल गुप्ता व मिनाक्षी मोहनलाल गुप्ता | रीना सुनील पडित |
| १६. | जूचंद्र | JC01/1193/42 | फुर्कन एस सय्यद | सुस्मिता मैती |
| १७. | जूचंद्र | JC02/1778/47 | मेप्लॅटीनम रियल्टर्स | करुणा स्टीफन लोबो |
| १८. | जूचंद्र | JC02/1870/31 | सुभाना शेख | गेनाराम गोमाजी चौधरी |
| १९. | जूचंद्र | JC03/1061/1 | संतारा अमृतलाल यादव | संतारा अमृतलाल यादव, अमृतलाल रामप्रसाद यादव |
| २०. | जूचंद्र | JC01/1193/118 | प्रदिप आरसंदिमनी | माधुरी दिनेश पाटील |

जावक क्र. वविशम/विवा/३०७२/२०२४-२५
दिनांक : १०/०१/२०२५

सही/-
सहा.आयुक्त
प्रभाग समिती 'जी' वालीव
वसई-विरार शहर महानगरपालिका

पान १ वरून....

## स्क्रिझोफेनियामुळे तिचे मातृत्व ...

दिलेल्या तक्रारीनुसार अभिलाषा यांच्यावर हत्येचा गुन्हा नोंदवून तिला अटक केली आहे. अभिलाषा यांचे पती सरकारी कर्मचारी आहेत. हे उप-सचिव पदी कार्यरत असून सदर घटनेने फरच खचून गेले असल्याची महिती पोलिसांनी दिली. पोलीस सध्या या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## दिराने स्वतःच्या वहिनीलाच पटवले...

मुलाशी वाद घालत होता. पतीचे घरात दुर्लक्ष आणि दारुच्या व्यसनाला पत्नी माधुरी (बदललेले नाव) कंटाळली होती. पंकेश हा विवाहित असून त्याला दोन मुले आहेत. त्याचे माधुरीशी चांगले संबंध होते. मोठा भाऊ चंद्रकांत हा पत्नीचा छळ करीत असल्याची त्याला जाणिव होती. अनेकदा पंकेश हा चंद्रकांत आणि माधुरीचे भांडण सुरु असल्यानंतर त्यांच्या घरी जाऊन भांडण सोडवत होता. माधुरी ही पंकेशसोबत किराणा आणायला, खरेदी करायला किंवा अन्य कामासाठी जात होती. यादरम्यान, दोघांची जवळीक वाढली. प्रेमसंबंध जुळले. याबाबत माधुरीचा मुलगा बंटी यालाही माहिती होती. मात्र, वडिलाचा स्वभाव बघता त्यानेही आईच्या प्रेमसंबंधाला मूकसंमती दिली. माधुरी आणि पंकेश या दोघांचे अनैतिक संबंध बरेच वाढले. दबक्या आवाजात वस्तीत दोघांच्या प्रेमाची चर्चा होती. ती चंद्रकांतच्या कानावर आली. त्यामुळे त्याने दोघांवर पाळत ठेवली. महिनाभरापूर्वी शेतावर जाणार असल्याचे सांगून तो तासाभरात घरी परतला. त्यावेळी पंकेश हा त्याच्या घरी आढळून आला. त्यामुळे दोघांनाही चंद्रकांतने मारहाण केली. वहिनीला नेहमी मारहाण होत असल्यामुळे पंकेशचा जीव तुटत होता. त्याने पुतण्या बंटीला हाताशी धरले आणि चंद्रकांतचा खून करण्याचा कट रचला. सोमवारी रात्री चंद्रकांतला दारु पिण्यासाठी बोलावले. उमरेड-बुटीबोरी राज्य महामार्गावर नेऊन दारु पाजली. त्यानंतर बंटी आणि पंकेशने चंद्रकांतचा गळा आवळून खून केला. ओळख पटू नये म्हणून त्याच्या चेहरा दगडाने ठेचला. मात्र, दुसऱ्या दिवशी पोलिसांनी तंत्रज्ञान व गुप्त माहितीच्या आधारे हत्याकांडाचा छडा लावला व आरोपींना अटक केली.

## चारित्र्याच्या संशयाने घात झाला...

धक्कादायक बातमी समोर आली आहे. अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून पतीने पत्नीची निर्घृण हत्या केलीय. मृत महिलेचे नाव राखी पाटील (वय वर्ष २७) आहे. तर आरोपी पतीचे नाव सुरज पाटील (वय वर्ष ३४) आहे. या जोडप्यांना २ मुलं असून, दोन दिवसांपूर्वीच तुळजाई नगरमध्ये हे कुटुंब भाड्याच्या घरात राहायला गेले होते. काही दिवसांपूर्वी राखी घरातून बाहेर पडली. ती नेमकी कुठे, कशाला आणि कुणाला भेटायला गेली? याची माहिती पतीला नव्हती. राखी काही वेळानंतर घरी परतली. पतीला पत्नीचे कुणाशी तरी अनैतिक संबंध असल्याचा संशय आला. दोघांमध्ये बाचाबाची झाली. टोकाच्या भांडणात पतीचा राग अनावर झाला अन् त्यानं जड वस्तू थेट पत्नीच्या डोक्यावर वार करत तिला जखमी केली. वार इतका जोरात बसला की, पत्नीचा जागीच मृत्यू झाला. हत्येनंतर सुरज राखीला घेऊन खासगी दवाखान्यात गेला. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. यासंदर्भात पतीची चौकशी केली असता, पोलिसांना सुरजने सांगितले की, पत्नी इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून पडली. परंतू, घटनास्थळी रक्ताचे डाग आढळल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर राखीचा मृत्यू तिसऱ्या मजल्यावरून खाली पडल्यामुळे नसून, डोक्यावर वार केल्यामुळे झाले असल्याचं तपासात स्पष्ट झालं. हत्येनंतर पती आपल्या मुलांसह पळून गेला होता. मात्र, पोलिसांनी काही तासातच त्याला पकडले. आरोपीची पोलील कसून चौकशी करत असून, हुडकेश्वर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करत पुढील तपासाला सुरूवात केली आहे.

## दोघांमधील प्रापंचिक वाद भयंकर ...

होते. नारायण हा बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरकडे सेंट्रिंगचे काम करतो, तर मंदा इतरांकडे रोजंदारीने मजुरी करते. चव्हाण कुटुंबाची परिस्थिती जेमतेमच. यथावकाश मंदा व नारायण यांना दोन मुले झाली. एक मुलगा आणि मुलगी. शौर्य आणि गायत्री अशी त्यांची नावे. त्यांचे एकंदर सर्व काही सुरळीत होते. सन २०२१ साली संपूर्ण जगावर कोरोनाचे संकट आले. सोशल डिस्टन्सींग आणि रोगाच्या अनेक प्रतिबंधात्मक उपायामुळे अखेर सरकारला लॉकडाऊन जाहीर करावा लागल्याने अनेक व्यवसायिक व नोकरदार मंडळींना शहरातून परागंदा व्हावे लागले. बरीच मंडळी त्यांच्या मूळ गावाकडे परतली. अशाच काही कारणामुळे नारायण चव्हाण हा पत्नी व मुलांना घेऊन राहुरी तालुक्याच्या पश्चिमेकडील मोमीन आखाडा येथे रहायला आला. तेथे रहायला आल्यानंतर तो त्याच्या सेंट्रींगच्या कामाला सकाळी सकाळी निघून जायचा. त्याची बायको मंदा हीसुद्धा जवळपासच्या शेतकऱ्यांच्या शेतावर कामाला जायची. त्यांची मुले आता मोठी झाल्याने ती आता शाळेत जायला लागली होती. मंदा ही शेतमजुरी करत असली तरी तिचे रहाणे नीटनेटके होते. स्वभावही मोकळा असल्याने परिचयाच्या माणसाबरोबर ती मोकळ्या मनाने बोलत असे. फोन वगैरे करत असे. सेंट्रींग कॉन्ट्रॅक्टच्या कामावर नारायण सकाळी जात असे. हे काम हेवी असल्याने कामावरून येतांना त्याला बराच वेळा उशीर होत असे. आता तो कामावरून घरी परतल्यानंतर मंदा हिच्या चरित्रावर संशय घेऊ लागला होता. बऱ्याचदा तो कामावरचा ताण मंदावर काढू लागला होता. तिला अश्लील शिवीगाळ करून तो मारहाण करत असे. नारायण हा पत्नी मंदा हिला मारहाण करू लागल्याने तिने त्या-त्यावेळी आपले आई-वडील, भाऊ भाऊसाहेब जाधव यांना पती छळ करत असल्याची माहिती दिली होती. नारायण बांधकाम क्षेत्रात काम-धंदा करत असल्याने गेल्या काही महिन्यापासून दारूच्या आहारी गेला होता. तो आता वरचेवर दारू पिऊन बायको मंदा हिला बेदम मारहाण करत होता. त्याच्या या मारहाणीमुळे मंदा वैतागली होती. काही वेळेस तर नारायणच्या त्रासामुळे मंदा ही माहेरी जायची. मंदाच्या सासरी तिची सासू रूक्मिणी बाजीराव चव्हाण, दीर हरिभाऊ बाजीराव चव्हाण हे त्या नवरा-बायकोचे भांडण सोडण्याऐवजी आगीत तेल ओतत असत, त्यामुळे मंदा हिला शेवटचा आशेचा किरण म्हणजे तिचे माहेरच होते. मंदा माहेरी रूसून गेल्यानंतर काही दिवसांनी तिचा नवरा कोणाला तरी मध्यस्थी घालून गोड-गोड बोलून तिला सासरी मोमीन आखाड्यावर घेऊन येत असे. नारायणचे आता हे नेहमीच झाले होते, त्यामुळे मंदाच्या माहेरचे सगळेच वैतागले होते. नवरा-बायकोच्या भांडणामुळे त्यांच्या शौर्य, गायत्री या बालकावरही वाईट परिणाम झाला होता. ती नेहमीच भेदरलेली असत. काही वेळेस ते मामाला फोन करून आपले बाबा आईला किती बेदम मारहाण करतात हे चोरून सांगत. नारायण आता पशु झाला होता. तो सांगण्याच्या पलीकडे गेला होता. म्हणतातं ना अती तिथे माती. नारायणने त्याच्या स्वतःच्या हाताने त्याच्या संसाराची माती करून घेतली होती. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात दिवाळी होती आणि दिवाळीच्या दिवशी नारायणने पत्नी मंदाला दारू पिऊन बेदम मारहाण केली. तिला सोडवायला घरातील कोणी नव्हते. मुलं लहान होती. ती नेहमी भेदरलेली असायची. पती नारायणच्या मारहाणीला कंटाळून मंदा तिच्या माहेरी पुणे जिल्ह्यातील वाघोली हवेली येथे गेली होती, ते सासरी परत न येण्याच्या निश्चयाने. मंदा माहेरी गेल्याने नारायण तिला आणण्यासाठी दोन वेळा पुण्याला गेला, मात्र त्याच्याबरोबर जाण्यासतिने नकार दिल्याने नारायण हा मुलगा शौर्याला घेऊन पुन्हा मोगीन आखाडा, ता. राहुरी येथे आला होता. आपण स्वतः आणायला जाऊनही मंदा येत नाही म्हणून नारायण याने आपली आई रूक्मिणी, भाऊ हरिभाऊ यांना सांगितले की, मंदाला फोन करून इकडे बोलावून घ्या, त्यामुळे मंदाची सासू व दीर यांनी मंदा फोन करून तू नांदण्यासाठी आली नाही तर तुझ्याकडे पाहून घेऊ अशी धमकी तिला दिली. सासरवाडीकडून वेळोवेळी आलेल्या धमक्यांचे फोन आणि लहानग्या मुलांची काळजी म्हणून मंदा पुन्हा तिच्या सासरी मोमीन आखाड्यावर आली आणि तिने पुन्हा एकदा संसाराला सुरूवात केली, पण तिला काय माहित की कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच असते. ती सरळ कधीच होत नाही. पती नारायण चव्हाण याने दारू पिऊन पुन्हा मंदाला खूप मारहाण केली. याबाबत मंदाची मुलगी गायत्री हिने तिचा मामा भाऊसाहेब जाधव यांना फोन करून सांगितले. त्यावेळी मामाने भाची गायत्रीला धीर देऊन पुन्हा असे झाल्यावर मला लगेच सांग असे सांगितले. सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास नारायण-मंदाची मुले शौर्य आणि गायत्री हे दोघे शाळेतून घरी आले. त्यांनी घराकडे बघितले तर घराला बाहेरून कडी लावलेली होती. त्यांना बाटले की आपली आई काही कामानिमित्त बाहेर गेली असावी. ते दोघेही दरवाजा जवळ आले. ते दरवाजा उघडून घरात पाऊल टाकणार तेवढ्यात त्यांचे पाऊल जागेवरच थबकले. घरातील ती परिस्थिती बघून त्यांनी आरडाओरडा सुरू केला. त्यांचा आरडाओरडा ऐकून शेजारी-पाजारी त्यांच्याकडे धावत-पळतच आले. त्यावेळी घरामध्ये मंदा चव्हाण रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. कोणीतरी अज्ञात इसमाने कुठल्या तरी हत्यारांनी तिच्या डोक्यावर व चेहऱ्यावर बार करून तिला गंभीर जखमी केले होते. असे एकंदर भयानक वातावरण चव्हाण कुटुंबाच्या घरात दिसत होते. यावेळी गायत्रीने मामाला फोन करून याबाबत सांगितले, त्यावेळीमामा भाऊसाहेब जाधव यांनी तिला सांगितले की शेजाऱ्या-पाजाऱ्यांना सांगून मम्मीला दवाखान्यात घेऊन जा, त्याप्रमाणे गायत्री व शौर्य यांनी आपल्या शेजाऱ्यांना सांगितले. त्यांचे शेजारी भाऊसाहेब राठोड बांनी इतरांच्या मदतीने गंभीर मंदा चव्हाण हिला वाहन करून तातडीने राहुरी येथील ग्रामीण रूग्णालयात हलवले. दरम्यान मंदाचा भाऊ भाऊसाहेब जाधव यांनी त्याची दुसरी बहीण रेखा हिला मंदाविषयी कळवले. तो आणि इतर नातेवाईक पुण्याहून राहुरीकडे येण्यास निघाले. - ते प्रवासात असतांनाच मंदा चव्हाणच्या घराशेजारील भाऊसाहेब - राठोड यांचा भाऊसाहेबला फोन आला. त्यांनी सांगितले की, मंदाची तब्येत गंभीर असल्याने तिला अहिल्यानगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारसाठी हलवण्यात आले आहे. पुण्याहून मंदाचा भाऊ भाऊसाहेब, बहीण रेखा व इतर नातेवाईक पुणे येथून सरळ अहिल्यानगर येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे गेले. त्यावेळी तेथील डॉक्टर मंदावर उपचार करत होते. मंदा हिला जखमी अवस्थेत राहुरीतील ग्रामीण रूग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून घटनेची माहिती राहुरी पोलिसांना दिली होती. राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ, कॉन्स्टेबल रविंद्र कांबळे यांनी तात्काळ ग्रामीण रूग्णालयात धाव घेऊन घटनेची चौकशी केली. जखमी मंदाची तब्येत गंभीर असल्याने तिला अहिल्यानगर सिव्हिल हॉस्पिटलला हलवले. गंभीर जखमी मंदाचा अहिल्यानगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असतांना मंदाचा भाऊ भाऊसाहेब जाधव यांना मंदाचे शेजारी भाऊसाहेब राठोड यांचा फोन आला होता. तुझे दाजी नारायण बाजीराव चव्हाण यांनी तुझ्या बहीणीला लाथा-बुक्क्याने तसेच चाकूने कपाळ व डोक्यात मारहाण करून जखमी केले आहे. त्या माहितीवरून मंदाचा भाऊ भाऊसाहेब जाधव यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. यामध्ये नारायण बव्हाण यानेच मंदाला मारल्याचे त्यांनी सांगितले. त्यांची रितसर फिर्याद घेऊन तिचा पती नारायण चव्हाण, आई रूक्मिणी चव्हाण, दीर हरिभाऊ चव्हाण या सर्वांच्या विरुद्ध गुन्हा रजि. नंबर १२२०/ २०२४ भारतीय न्याय संहिता १०६ (१), ११५ (२), ११८ (२), ३५१ (२), ३५१ (३) अन्वये गुन्हा दाखल केला. मंदा हिच्यावर उपचार सुरू असतांना तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी १०३ (१) हे कलम वाढवून या सर्वांना अटक केली. मंदाची सासू असाध्य रोगाने आजारी असल्याने कोर्टाने तिला जामीन दिला. इतर दोघे मात्र न्यायालयाने कोठडीत आहेत. डी. वाय.एस.पी. डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस तपास करत आहेत.

# युवा दिना निमित्त विद्यार्थ्यांनी राबवली स्वच्छता मोहीम



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या आजी माजी विद्यार्थ्यांनी युवा दिनाचे औचित्य साधून वाडा ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. रविवार दि. १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन असून हा दिवस भारतभर युवा दिन म्हणून साजरा केला जातो. कनिष्ट महाविद्यालयाचे प्रा. हेमंत फुपगारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी विवेकानंद स्वच्छता दूत म्हणून पन्नासहून अधिक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी ग्रामीण रुग्णालयाचा परिसर स्वच्छ केला या कामी नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनीही सहकार्य केले. तर पुढील नियोजना नुसार लवकरच शहरतील मंदिरांच्या परिसराची स्वच्छता करणार असल्याचा मानस प्रा. फुलगरे यांनी व्यक्त केला.

## वाडा मनोर महामार्गावरील अपघातात एक ठार तिन जखमी

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील पाली गावाच्या हद्दीत वाडा मनोर या महामार्गावर टेम्पो आणि दुचाकीच्या विचित्र अपघातात दुचाकी वरील एक मुलगी ठार झाली आहे तर त्याच दुचाकी वरील बहीण भाऊ व टेम्पो चालक असे तिघेही गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. गुरुवारी( दि.९) रात्री साडे आठ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. कंचाडहून वाड्याच्या दिशेने येणारा आयषर टेम्पो व वाड्याहून पालीच्या दिशेने जाणारी दुचाकी यांच्यात समोरासमोर धडक बसून अपघात झाला या अपघातात दोन्ही वाहने रस्त्याकडेला असलेल्या उतारावर खाली पलटल्याने दुचाकी वरील तिघे व टेम्पो चालक असे चौघांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता यातील स्नेहा बंधू झिरवा ( वय२६) ही मयत झाली होती तर टेम्पो चालक जखमी झाल्याने त्याला दुसरीकडे उपचारासाठी हलवण्यात आले आहे. अंकिता अंबात व हर्षल अंबात यांनाही इतरात्र हळविण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे. निखिल झिरवा याने दिलेल्या फिर्यादी वरून टेम्पो चालका विरोधात वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मयूर शेवाळे हे अधिक तपास करत आहेत.

पान ८ वरून....

## पालघर पोलीस दलाकडून 'रस्ता सुरक्षा ...

वाहन चालकांना पुष्पगुच्छ देऊन दुचाकी चालवणे हेल्मेट वापरणार याबाबत आव्हान करण्यात आले पालघर भोईसर येथील एसटी डेपो वाहन चालकासाठी कार्यशाळा आयोजित करून वाहतुकीच्या नियमाबद्दल जनजागृती करण्यात आली. दरम्यान जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी असे आव्हान केले की रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती करण्यासाठी रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वरील प्रमाणे उपक्रम राबवण्यात येणार असून अभियानात यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकांनी वाहतूक नियमाचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे, असे पालघर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी सांगितले.

## 'वसई-विरार महानगर पत्रकार संघां'तर्फे ...

केल्या आहे. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्षापेक्षा पत्रकारच जास्त प्रभावीपणे करतात. मला वाटते तीच, लोकशाही आहे, असं बरेच जण गृहीत धरून त्या पद्धतीने वागत असतात. अशा लोकशाहीला गृहीत धरणाऱ्या लोकांपासून पत्रकार समाजाचे रक्षण करतात. त्यांच्यावर सखोल लिखाण करून त्यांच्या चुकीच्या विचारांवर पत्रकार नेहमीच अंकुश ठेवतात. या महत्त्वाच्या कार्याबरोबरच सरकार, विरोधी पक्ष, समाज आणि नवीन पिढी यांना एकत्र घेवून पुढे जायचे आहे. यासाठी पत्रकारांना खूप मोठे योगदान द्यावे लागणार आहे.

आमदार स्नेहा दुबे-पंडित यावेळी म्हणाल्या की, समाजाचा आरसा असणारे पत्रकार आपली जबाबदारी चोख पार पाडत आल्यानेच समाज सशक्त होऊ शकतो. पत्रकार हे जागृत असून, त्यासाठी राज्यातील तमाम पत्रकारांचे मी ऋण व्यक्त करते. वसईतील पत्रकार निष्पक्ष असून, येथील समस्या आणि प्रश्नांना चव्हाट्यावर आणण्याचे आपले कार्य त्यांनी निरंतर असेच पुढे सुरू ठेवावे. त्यातून विधानसभेत प्रश्न मांडताना आम्हालाही मदत होणार आहे. शासनाच्या चांगल्या योजना जनतेपर्यंत नेतानाच, राज्यकर्ते म्हणून आमच्याकडून नकळत काही चुका झाल्यास त्याही पत्रकारांनी आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. आपल्या नावापुढे वडिलांच्या नावाप्रमाणेच आईचेही नाव लावण्याचा मातृ सन्मान कायदा आणणारे महाराष्ट्र हे राज्य देशातून पहिले असून, या प्रश्नावर श्रमजीवी संघटनेने दिलेल्या लढ्यास पत्रकारांनी मोठी प्रसिद्धी दिली होती. यासाठी मी त्यांना धन्यवाद देते. आपल्याला दिलेले व्यासपीठ हे कसे वापरायचे? हा ज्याचा त्याचा प्रश्न असून, विषयानरूप वागायचे हा आमचा संस्कार असल्याचा मार्मिक टोलाही आमदार सौ. दुबे-पंडित यांनी कुणाचे नाव न घेता लगावला.

आमदार राजन नाईक यांनी, लोकशाहीचा चौथा आणि महत्वाचा स्तंभ असणाऱ्या पत्रकारांच्या उद्धवणाऱ्या समस्या आणि त्यांची सुरक्षा याबाबत शासनस्तरावर नक्कीच योग्य ते प्रयत्न आणि पाठपुरावा करण्यात येईल, याबाबत आश्वस्त केले. तर माजी आमदार क्षितिज ठाकूर यांनी, पत्रकार विविध संघटनातून विभागले असून, त्यांनी त्याऐवजी एकत्रित यावे, असे उपदेश दिले. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, त्यांनी जगासोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून चालावे, एआय तंत्रज्ञानाची चांगली माहिती करून घेऊन, आपल्या उत्कर्षासाठी त्याचा सकारात्मक उपयोग करून घ्यावा, असे सांगितले.

मदर वेलंकनी शिक्षण संस्थेच्या संस्थापिका सौ. आशा डिसोजा यांनी संस्थेची माहिती आपल्या मनोगतात देऊन, पत्रकार व लोकप्रतिनिधी यांना धन्यवाद दिले. वसई-विरार महानगर पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिलराज रोकडे यांनी, वसईतील पत्रकार आणि साहित्यिक यांची परंपरा आणि नामावली विशद करून, आम्हाला जुन्या जाणत्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पत्रकारांचा वारसा लाभला असल्याचे अभिमानाने सांगितले. यावेळी माजी महापौर रुपेश जाधव, भाजपचे जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट, माजी नगरसेवक निलेश देशमुख व भूपेश पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. मदर वेलंकनी शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. दिप मुरझेलो, पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष झाकीर मेस्त्री व खजिनदार विजय खेतले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सुनील घरत व लक्ष्मणराव पाटोळे, सहसचिव विश्वनाथ कुडू, कार्यालय प्रमुख चंद्रकांत भोईर, सदस्य प्रथमेश तावडे, आशीष कदम, संतोष गायकवाड, मच्छिंद्र चव्हाण, जयराज राजीवडे, सोनल महाडिक, शहनाज शेख हरिभाऊ गायकवाड, नजीर मुलाणी इत्यादी पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता सिंग यांनी केले. शिक्षण संस्थेचे शिक्षक, विद्यार्थी, पालक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून...

बांधवांना आज पुरस्कार देऊन प्रोत्साहित करत आहात. पुरस्काररूपी कौतुकाची थाप त्यांच्या पाठीवर मारल्याने काम करण्यासाठी बळ मिळते असे ते म्हणाले. यावेळी आभासी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून व्हॉईस ऑफ मिडीयाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी सर्व पत्रकारांशी पत्राकर दिनानिमित्त संवाद साधताना लातूर जिल्हयाकडून पत्रकारांसाठी विधायक काम व्हावे, ते काम चिरंतन स्मरणात राहिल, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार यांनी पत्रकारांच्या कल्याणासाठी राबवण्यात येत असलेल्या पंचसुत्रीची माहिती दिली. तसेच नाटय समिक्षक अनिल पुरी यांनी जेष्ठ रंगकर्मी बंकट पुरी यांच्या नावाने उत्कृष्ट करणाऱ्या पत्रकारास सन्मानीत करण्यासाठी सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र रोख ५ हजार रूपये अशा पुरस्काराची घोषणा केली. या पुरस्काराचे पुढच्या महिण्यात वितरण करावे, असे ते म्हणाले. तसेच अभय मिरजकर, प्रभाकर शिरूरे, शिरिषकुमार शेरखाने, नेताजी जाधव, हमिद शेख यांनी यांनी पत्रकार दिनानिमित्ताने संघटनात्मक वाढीसाठी विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगम कोटलवार यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. डॉ. सितम सोनवणे यांनी केले. यावेळी काकासाहेब घुटे, राघवेंद्र देबडवाड, सचिन चांडक, नेताजी जाधव, अनिल पुरी, हमीद शेख, विनोद चव्हाण, शिरीषकुमार शेरखाने, मधुकर चलमले, खंडेराव देडे, राम रोडगे, प्रभाकर शिरूरे, अशोक कुलकर्णी, दिलीप मुनाळे, सुभाष सगर, आनंद माने, गजानन ढगे, संतोष खंडेलवाल, माऊली परांडे, अभय मिरजकर, संतोष सोनवणे, प्रकाश कंकाळ, साईनाथ घोणे, बाळासाहेब जाधव, योगीराज पिसाळ, मन्मथ बिडवे, अमोल घायाळ आदी उपस्थित होते. दरम्यान व्हॉईस ऑफ मिडीया लातूर वतीने २०२५चा सेवा पुरस्कार सप्ताहिक उधळणचे संपादक मधुकर विठोबा चलमले, साप्ताहिक नंदादिप वार्ताचे खंडेराव निवृत्ती देडे, खबरसे हकीकत तकचे शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांना तर युवा पुरस्कार भारत सत्ता लाईव्हचे हमिद शेख, एलटीएन न्यूझचे नेताजी जाधव यांना तसेच विविध नाटय चळवळीत योगदान दिल्याबद्दल नाटय समिक्षक अनिल बंकट पुरी यांचा महानगर शाखेच्यावतीने गौरव, मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्काराने प्रा. विनोंद चव्हाण यांचा सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन पुरस्काराने गौरव करण्यात आला.

## लातूरात बांगलादेशी, पाकिस्तानी...

चौकशी होणे गरजेचे असल्याचे मत या निवेदनात व्यक्त करण्यात आले आहे. घुसखोरांमुळे देशात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून धार्मिक शोभयात्रांवर दगडफेक, ट्रेन घातपात करण्याचे प्रयत्न, दंगली घडवण्याचे प्रकरण वाढ होत आहे. हे घुसखोर खोटी कागदपत्र बनवून सर्व शासकीय योजनांचा तसेच फ्री राशनचा लाभ घेत आहेत. इन्कम टॅक्स, मालमत्ता कर, पाणी कर, जीएसटी व इतर कर भरणा करणारी हे भारतीय नागरिक आहेत आणि आमच्याच कराच्या पैशावर घुसखोरांना पोसले जात आहे असेही या निवेदनात म्हटले आहे. यावेळी हिंदुत्व जागर संघटनेचे अध्यक्ष मनोज सुर्यवंशी, उपाध्यक्ष संतोष तोष्णीवाल, सचिव शाम भराडिया, सहसचिव महादेव दभणे, कोषाध्यक्ष शिवकांत ब्रिजवासी, सदस्य व्यंकटेश कुलकर्णी, दिलीपचंद चोपडा, संतोष पांचाळ, लक्ष्मीकांत कुलकर्णी, गणेश पाटील, कन्हैय्यालाल जंत्रे उपस्थित होते.

## रोटरीच्या चित्रकला स्पर्धेचे ...

कौशल्याचे मूल्यमापन करून त्यामध्ये सुधारणा कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक कलाशिक्षक व विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित राहिल्याबद्दल प्रोजेक्ट चेअरमन रमेश चिल्ले यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सचिन मालु यांनी केले. क्लबचे अध्यक्ष चेतन पंढरीकर, सचिव गिरीश पेन्सलवार, श्रद्धानंद आपशेट्टी, जगदीश कुलकर्णी, अमोल दाडगे, सतीश कडेल, पवन मालपाणी, कलश मुंदडा, अनुप देवणीकर, श्रवण बियाणी, मनोज सुर्यवंशी, किशोर दाताळ,पवन मालपाणी, प्रशांत भाटगावे, ओमप्रकाश झुरुळे, योगेश काळे, गोविंद कुंचमवार, मोतीलाल वर्मा, गणेश सावंत, विरेंद्र पुंडीपल्ले, राजेश दायमा, विकास बारोळे, लक्ष्मीकांत अग्रोया, अविनाश भोसले, विशाल इटकर, व इतर सदस्य मोठ्या संख्येत उपस्थित होते. यावेळी एकूण ५६ विजेत्या मुलांना बक्षिसे व सायकलीचे वाटप करण्यात आले.

## वाडा येथे 'रेझिंग डे' निमित्त पोलिसांचे...

अशा विविध कायद्यांबाबत पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक मयूरेश् अंबाजी, पोलीस कर्मचारी गजानन जाधव व चेतन सोनवणे उपस्थित होते. वाडा निर्मिती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष योगेश गंधे यांनी आलेल्या पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियांका रोडगे यांनी केले तर रिया लांडगे यांनी आलेल्या पाहुण्यांचे आभार व्यक्त केले.

## वसई-विरारमध्ये लायन्स क्लब आणि ...

शिल्पी रस्तोगी, दीपक बडगुजर, डॉ. सोमनाथ विभुते, सुनील लावटी, मानस विभुते यांनी विशेष मेहनत घेऊन भव्य ट्रॅफिक रॅलीचे यशस्वी आयोजन केले, यात डिस्ट्रिक्ट गवर्नर लायन सरस्वती संकर, माजी प्रांतपाल लायन डॉ.प्रशांत पाटील व माजी प्रांतपाल लायन हेमंतराज सेठीया, प्रथम उप प्रांतपाल मनोज बाबूर, द्वितीय उप प्रांतपाल नटवर बांका, विकास सराफ, उर्वी रजिस्ट्रर, डॉ. प्रवीण छाजड व अनेक लायन सदस्य सामील झाले. यात ट्रॅफिक विषयी बोध वाक्य, घोषणाचे फलक घेऊन NSS, NCC, न्यू इंग्लिश स्कूलचे बँड पथक, सेंट जेम्स हायस्कूल, आगाशीचे लेझीम पथक, साई प्रेरणा वस्ती स्तर बचत गटाच्या महिला, विविध लायन्स क्लबचे अध्यक्ष, लायन शिवा डोंगरे, रंजना म्हात्रे, दयानंद मानकर, कल्पेश शाह, सौ वर्षा मोदगेकर, नागर गहलोत यांनी रॅलीचा बॅनर घेऊन दीड किलोमीटरची वाटचाल केली ज्यात जवळ जवळ २५० लोकांनी सहभाग घेतला, यात ट्रॅफिक पोलीस, अनेक लायन मेंबर्स सामील होते. राष्ट्रीय सैनिक संस्थेचे मुंबई प्रदेशचे पदाधिकरी यात मार्गदर्शन करीत होते. ह्या रॅलीची सांगता स्टेला पेट्रोल पंपच्या मागे, ड्रीम अरेना बँकवेट हॉल मध्ये झाली, तिथे ट्रॅफिक पोलीसासाठी विनामूल्य आरोग्य तपासणीचे आयोजित केले होते. मेडिब्रेन सोशल फौंडेशन ह्या वैद्यकीय सेवा संस्थेने सुट्टीची परवा न करता दिवस रात्र नागरिकांच्या सुरक्षेसाठी ड्युटी करणाऱ्या पोलिसांची मोफत मधुमेह, पूर्ण नेत्र तपासणी, इ सी जी, फुफ्फुस, रक्तदाब, जनरल तपासणी अशा विविध तपासण्या केल्या. १५० च्या वर पोलीस कर्मचाऱ्यांनी या तपासणीचा लाभ घेतला. डीसीपी सौ पूर्णिमा चौगुले मॅडम यांनी त्यांच्या भाषणातून अनेक विषयाची माहिती दिली व उत्तम मार्गदर्शन केले. त्यांनी लायन्स क्लबचे अनेक कार्यामध्ये मदत होत असल्याबद्दल लायस गप चे आभार मानले रॅलीतील मुलांना लायन्स क्लबच्या गुडी बॅगेतून अल्पोपहार देण्यात आला. माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री दहिफळे व वसई पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री बाळकृष्ण घाडीगावकर इतर मान्यवर लायन्स लीडर्स सोबत मंचावर उपस्थित होते.

13 TO 19 JANUARY 2025 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 1/11/2025 8:46 PM Page 1



# भिवंडीत भोंदू बाबाने महिलेला घातला पाऊणे नऊ लाखांचा गंडा

**भिवंडी/प्रतिनिधी**

अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात आला तरीसुद्धा आजही भोंदू बाबांकडून भोळ्या भाबड्या नागरिकांची फसवणूक करण्याचे गुन्हे समोर येत आहे.पतीच्या आजारपण तसेच मुलावरील काळी जादू उतरवण्यासाठी मृतदेहाची पूजा करायची आहे असे सांगून महिलेकडून ८ लाख ८७ हजार उकळण्याचा प्रकार समोर आला आहे. नुसरा अख्तर अलीम अन्सारी, ४६ वर्षे, रा.मिल्लतनगर असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव असून हजरत बाबा उर्फ अमजद असद खान असे गुन्हा दाखल झालेल्या भोंदू बाबाचे नाव आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार महिला यांचे पती अख्तर हे आजारी असल्याने त्यांनी उपचार करून ही सुधारणा होत नसल्याने त्या दरम्यान महिलेच्या दुकानात ऑक्टोंबर २०२३ मध्ये ग्राहक म्हणून आलेल्या हजरत बाबा यांच्याशी ओळख झाली. त्याने चिंताग्रस्त पती सोबत बोलताना तुमच्यावर काळी जादू झाली असल्याचे सांगितले.तर मुलावर कोणीतरी काळी जादू केली असून, मुला वरील काळी जादू न उतरवल्यास सहा महिन्यात तो जीव गमावून बसेल अशी भीती दाखवत ही काळी जादू संपवण्यासाठी कब्रस्तानातील मृतदेह आणावा लागेल. त्यातून पती व मुला वरील त्रास संपेल तसेच तुमची आर्थिक परिस्थिती सुधारून दुकान सुध्दा चांगले चालेल असे सांगितले. पिडीत महिलेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांच्या समोर घरात केलेल्या पुजे दरम्यान अंड्या मधून खिळा काढून दाखवला. त्यानंतर चांदवड मालेगाव येथे मृतदेह मिळणार असल्याचे सांगत पीडित कुटुंबीयांना बाबा चांदवड मालेगाव येथे घेऊन गेले. तेथील बाबाच्या साथीदाराने दहा लाख रुपयांत मृतदेह मिळेल असे सांगितल्या नंतर हजरत बाबा याने घासाघीस करून आठ लाख रुपयांत सौदा पक्का केला.परंतु त्यानंतर भोंदू बाबा याने कोणताही मृतदेह न आणता एका बॉक्स मध्ये खोटा मृतदेह आणून तो गैबी नगर मधील इमारती मध्ये तो ठेवला असल्याचे सांगितले. पैसे घेताना पीडित कुटुंबीयांचा विश्वास संपादन करण्यासाठी महिलेला एका मृतदेहाचा फोटो मोबाईल वर पाठवून दिला. दरम्यान या मुळे पीडित कुटुंबीय कर्जबाजारी झाले असताना याच भोंदू बाबाने या पीडित कुटुंबीयाला खाजगी सावकारा कडून महिना नऊ टक्के व्याजाने तीन लाख रुपये कर्जाने मिळवून दिले. परंतु त्यानंतर भोंदू बाबाने कोणतेही काम न करता फसवणूक केल्याचे लक्षात आल्याने पीडित महिलेने अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मुक्ता दाभोळकर यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार जिल्हाध्यक्ष वंदना शिंदे यांच्याकडे पीडित महिलेने आपली कैफियत मांडली.त्यांनी सदरची घटना पोलीस आयुक्त यांना सांगताच पोलिस प्रशासनाची चक्रे वेगाने फिरली.त्यानंतर पीडित महिलेने दिलेल्या तक्रारी वरून शांतीनगर पोलिस ठाण्यात हजरत बाबा उर्फ अमजद असद खान या विरोधात भा.न्याय संहिता कलम ३१८(४),३१६ (२) सह महाराष्ट्र नरबळी आणि इत्तर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोना यांना प्रतिबंध घालण्या साठी व त्यांचे समूळ उच्चाटन करण्या बाबत अधिनियम २०१३ चे कलम ३(१) ३(२) अन्वये गुन्हा दाखल भोंदू बाबाच्या मुसक्या आवळल्या आहेत.त्याला भिवंडी न्यायालयात हजर केले असता १५ जानेवारी पर्यंत पोलिस कोठडी ठोठावण्यात आली आहे.त्याने अशाच पद्धतीने कोणाला फसवले आहे का याचा सुध्दा शोध पोलिस घेत आहेत अशी माहिती शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली आहे. महाराष्ट्रात कायदा केल्यानंतर ही अशा प्रकारच्या अंधश्रध्देच्या आहारी जाण्याच्या घटना घडत आहेत. पिडीत कुटूंबाचे आर्थिक शोषण झालेले आहे. संबंधित कुटूंबातील लोक सुशिक्षीत आहेत तरी देखील त्यांना भिती दाखवून त्यांचे शोषण झाले आहे.हे मानसिक दुर्बलतेचे देखील लक्षण आहे.आपल्या सारख्या सुजाण नागरीकांनी अंधश्रध्देच्या आहारी न जाता वैज्ञानिक दृष्टीकोन अंगिकारला पाहीजे अशी प्रतिक्रिया अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे भिवंडी शहर अध्यक्ष ज्ञानेश्वर गोसावी यांनी दिली असून या प्रकरणात पिडीत कुटूंबाला आधार देऊन त्यांना न्याय मिळावा व या प्रकरणातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी व भविष्यात अशा घटना होऊन कोणाचेही मानसिक, शारिरीक किंवा आर्थिक शोषण होणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी अशी मागणी ज्ञानेश्वर गोसावी यांनी केली आहे.

## अजमेर शरीफ दर्गा येथून परतीचा प्रवास ठरला अखेरचा

# पालघरमधील तरुणांवर काळाचा घाला!



**पालघर/प्रतिनिधी**

अजमेर शरीफ दर्गा येथून परतणाऱ्या पालघर तालुक्यातील भाविकांवर काळाने घाला घातला आहे. भरूच अंकलेश्वर परिसरात परतीचा प्रवास करत असलेल्या भाविकांची कार आणि ट्रकचा भीषण असा अपघात घडला आहे. या अपघातात पालघर तालुक्यातील तीन तरुणांचा मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. लोकांचं श्रद्धास्थान असलेल्या अजमेर शरीफ दर्गा येथून परतत असताना पालघर तालुक्यातील भाविकांचा अपघात झाला. काळाने आपला डाव साधत पहाटेच या भक्तांचा अपघाती मृत्यु झाला. अपघाताची भीषणता एवढी होती की जागीच तरुणांनी आपला श्वास सोडला.

या बाबतची माहिती अशी की, राजस्थान राज्यातील सुप्रसिद्ध असलेल्या अजमेर शरीफ दर्गा येथे पालघर तालुक्यातील मनोर, पालघर परिसरातील मुख्यतः तरुण असलेले भाविक दर्शनासाठी गेले होते. अजमेर शरीफ दर्गा येथे दर्शन घेऊन सर्व भाविक पालघरच्या दिशेने परतीच्या प्रवासासाठी निघाले होते. गुजरात राज्यातील भरूच- अंकलेश्वर परिसरात या भाविकांवर काळाने घाला घातला आहे. भविक प्रवास करत असलेल्या अर्टिगा कार आणि ट्रकची धडक झाल्याने भीषण असा हा अपघात घडला आहे. बुधवारी पहाटे दोन वाजताच्या सुमारास हा अपघात घडला असून अपघात इतका भीषण होता की कार आणि ट्रकच्या धडकेत कारचा पूर्णतः चक्काचूर झाला आहे. या भीषण अपघातात कारमधून प्रवास करणाऱ्या तीन तरुणांचा मृत्यू झाला आहे. आयान बाबा चोगले (रा. मनोर), ताहीर नासिर शेख (रा. पालघर) आणि मुदस्सर अन्सार पटेल (रा. टाकवहाळ) अशी या अपघातातील मृतकांची नावे आहेत. तर चारजण या भीषण अपघातात जखमी झाले असून सलमान अल्ताफ शेख, शाहरुख सलीम शेख, शादाब मलिक शेख आणि मोईन सलीम शेख (रा. काटाळे) अशी जखमींची आहेत. जखमींना उपचारासाठी भरूच परिसरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. परतीच्या प्रवासात असताना तीन तरुणांचा अपघातात असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# भिवंडीत वर्षभरात २०५० गुन्हे दाखल, १५०६ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरात पोलीस उपायुक्त परिमंडळ २ यांच्या अखत्यारीत असलेल्या एकूण सहा पोलीस ठाण्यात वर्षभराच्या काळात तब्बल २०५० गुन्ह्यांची नोंद झाली असून विशेष म्हणजे दाखल गुन्ह्यांपैकी १५०६ गुन्ह्यांची उकल करण्यात भिवंडीतील पोलिसांना यश मिळाले आहे अशी माहिती पोलीस उपायुक्त डॉ. मोहन दहीकर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे. भिवंडी शहरात हत्येचे २४ गुन्हे दाखल झाले त्यापैकी १८ हत्येच्या गुन्ह्यांची उकल झाली तर जीवे मारण्याच्या दाखल २९ गुन्ह्यांची उकल केली आहे. दरोड्याचे दोन गुन्हे दाखल असून ते उघडकीस आणण्यात आले आहेत. या सोबत जबरी चोरीच्या दाखल ७४ गुन्ह्यां पैकी ५८, घरफोडीच्या दाखल १६५ पैकी ८२ तर चोरीच्या ४९६ गून्ह्यांपैकी २१५ गुन्ह्यांची उकल झाली आहे. वाहन चोरीचे २८५ दाखल गुन्ह्यात अवघ्या १०२ वाहनं शोधण्यात पोलिसांना यश आले आहे. तर मारमारीचे एकूण २९७ गुन्हे वर्षभरात दाखल झाले आहेत. महिलांवरील अत्याचार विनयभंग व शारीरिक अत्याचार अर्थातच बलात्काराच्या घटना वाढल्या असून पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात वर्षभरात ६६



बलात्काराच्या घटना नोंद झाल्या आहेत. तर ९२ विनयभंगाच्या गुन्ह्यांची नोंद असून त्यापैकी ९१ गुन्ह्यांची उकल पोलिसांनी केली आहे. महिला छळाच्या ६३ गुन्हे नोंदवले गेले आहेत.अपहरणाच्या गुन्ह्यांची संख्या वाढली असून तब्बल २२८ अपहरण झालेल्या गुन्ह्यात २२७ अल्पवयीन असून त्यापैकी १६१ जणांना शोधण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. शहरातील स्थलांतरीत नागरिकांची वाढती संख्या, अनेक वेळा गुन्हा करून आरोपी परराज्यात पळून जात असल्याने पोलिस तपासाला बऱ्याच वेळा अपयश येत असते. परंतु त्यानंतर ही गुप्त बातमीदार, मोबाईलची तांत्रिक माहिती याआधारे पोलिस आरोपीं पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न पोलिस करीत असतात. परंतु मागील वर्षाच्या तुलनेत ही संख्या काही प्रमाणात वाढली असल्याचे बोलले जात आहे.

## ग्रामीण भागात हागणदारी मुक्त अधिक व स्वच्छतेची शाश्वतता टिकविण्यासाठी लोकचळवळ

# ग्रामीण भागातील जनेतेचे आरोग्यमान उंचावण्यासाठी प्रत्येक कुटूंबाने स्वच्छता राखावी -प्रकाश निकम

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यात कुटूंबस्तरावर वैयक्तिक शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन स्वच्छतेची सवय अंगीकृत करणे, नियमितपणे वापर करणाऱ्या कुटूंबांना प्रोत्साहन देणे, त्यांचे अनुकरण करण्याकरीता इतर ग्रामस्थांना, कुटूंबधारकांना त्यांच्याप्रमाणे वैयक्तिक स्वच्छतेच्या सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून घेण्यासाठी पालघर जिल्ह्यामध्ये दि. १ ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत स्वच्छ माझे आंगण अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन पालघर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम यांनी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीमध्ये केले. ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचाविण्यासाठी स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत स्वच्छतेची विविध कामे करण्यात येत आहेत. दि.१ ते २० जानेवारी या कालावधीत या अभियानाची अंमलबजावणी करायची आहे. दि.२१ ते २४ जानेवारी या कालावधीत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने वैयक्तिक स्तरावर शौचालयाचा वापर, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणाऱ्या कुटूंबांची पडताळणी करून कुटूंबांची निवड करायची आहे. ज्या कुटूंबाची निवड करावयाची आहे. त्यांच्याकडे किंवा




परिसरात घरगुती खतखड्डा, परसबाग, वैयक्तिक शोषखड्डा, पाझर खड्डा, वैयक्तिक शौचालय, घरगुती कचराकुंड्या आदी सुविधा असणे आवश्यक आहे. उत्कृष्ट व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांना दि.२६ जानेवारी २०२५ ला ग्रामसभेमध्ये सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने प्रशस्तीपत्र, श्रीफळ, पुष्प देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे. 'स्वच्छ माझे अंगण' अभियान अंमलबजावणी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक अतुल पारसकर यांचे नेतृत्वात करण्यात आले असून सर्व पंचायत समितीस्तरावर गटविकास अधिकारी यांना पत्रव्यवहार व सभा करण्यात आला असून गावस्तरावर स्वच्छ माझे अंगण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी सांगितले.

**स्वच्छ माझे आंगण अभियानाची उद्दीष्टे** : वैयक्तिक शौचालयांचा नियमित वापर करणे. शौचालयाची दैनंदिन स्वच्छता व शाश्वत स्वरूपात कुटुंबातील सर्व सदस्यांकडून वापर करणे. कुटूंबस्तरावर दैनंदिन घनकचऱ्याचे वर्गीकरण करणे कुटुंबस्तरावरावर ओला व सुका कचरा कुंड्यामध्ये वर्गीकरण करणे. वर्गीकरण केलेल्या घरगुती कचऱ्याचे कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा निर्मिती करून कचऱ्याचे घर किंवा घराच्या परिसरातच व्यवस्थापन करणे. सांडपाणी व्यवस्थापन, शोषखड्डा याद्वारे घरगुती स्तरावर सांडपाणी व्यवस्थापन घर किंवा घराच्या परिसरातच करणे. स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) व शासनाच्या विविध योजनाच्या माधमातून ग्रामीण भागात वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावर स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या स्वच्छतेच्या सुविधांचा नियमित वापर व देखभाल करून स्वच्छतेची अंगीकृत करण्यासाठी यापुढे लोकचळवळ करण्याच्या उद्देशाने स्वच्छ माझे आंगण अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर. भानुदास पालवे यांनी सांगितले.

# महिला मेळावा आणि लोकप्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन



**पालघर/प्रतिनिधी**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पालघर अंतर्गत महिलांसाठी विशेष मेळावा व लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत वेढी हद्दीतील वीट भट्टीवर करण्यात आले. या कार्यक्रमात महिला व बालकल्याणाच्या विविध योजनांबद्दल माहिती देण्यात आली तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषद सदस्या सरिता सुतार, पंचायत समिती सदस्या रेखा तरे, वेढी गावचे सरपंच नचिकेत पाटील, उपसरपंच अभिजीत पाटील, तसेच विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्य कार्यक्रमासाठी उपस्थित होते. वीट भट्टी व गावातील सुमारे १०० महिला, बालके आणि किशोरी मुलींनीही या कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शन मा. उउझज अमोल पवार यांनी केले. मुख्यसेविका सुरेखा सूरवसे यांनी महिला व बालकल्याणाच्या योजनांबद्दल सविस्तर माहिती दिली. लायन्स क्लब केळवा विभागाचे अध्यक्ष डॉ. हर्षल यांच्या सहकार्याने उपस्थित लाभार्थ्यांना स्वच्छता किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात वीट भट्टीवरील पाचवी ते दहावीपर्यंत शिकलेल्या किशोरी मुलींना वाचन साहित्य भेट देण्यात आले. तसेच THR (Take Home Ration) पासून तयार केलेल्या विविध पाककृतींचे प्रदर्शन भरवण्यात आले. महिलांना ग्रामपंचायत वेढीच्या वतीने ज्यूट बॅग देऊन गौरविण्यात आले. अंगणवाडी सेविकांनी व्यसनमुक्ती, शाळागळती आणि पोषण आहार या विषयांवर पथनाट्य सादर करून प्रबोधन केले. प्राथमिक आरोग्य केंद्र एडवनमार्फत लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप वीट भट्टीवरील महिला व मुलांनी सादर केलेल्या पारंपरिक तारपा नृत्याने करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत वेढी, विटभट्टी मालक सागर कवळी, आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रवीण भावसार व प्रकल्प अधिकारी अमोल पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे नियोजन कल्पना पिंपळे यांनी केले. त्यांच्या कार्याबद्दल व एकात्मिक बालविकास विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्या यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन कौतुक करण्यात आले.

# वसईतील महिला डॉक्टरची आत्महत्या; पतीवर गुन्हा दाखल

**वसई/प्रतिनिधी**

वसईतील कर्डिनल ग्रेशियस हॉस्पिटल येथे कार्यरत असलेली मयत डॉक्टर डेलीसा रॉयल परेरा (३९) रा. सोनारभाट चणेबोरी, पापडी या सदर हॉस्पिटलमध्ये फिजिओथेरपीस्ट पदावर कार्यरत होत्या. त्यांचा पती रॉयल वेलेरियन परेरा (४२) हा कार्गो शिप वरती नोकरीस आहे. त्याचे अन्य महिलेसोबत अनैतिक प्रेम संबंध असल्यामुळे दोहोंमध्ये वादविवाद होत असत. त्यामुळे डेलिया हिला शारीरिक मानसिक त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून तिने सदरचे कृत्य केल्याची तक्रार वसई पोलीस ठाण्यामध्ये देण्यात आली आहे. घटनेपूर्वी डेलिया आपल्या पती व सासूसह पापडी चर्च येथील धर्मगुरू कडे भेटीसाठी गेले होते. निघताना डेलीयाने येथील धर्मगुरूंकडे कनफेक्शन करताना, एक लिफाफा सादर केला होता. घरी आल्यानंतर तिने ब्लेडने स्वतःच्या



हातावरती वार करण्याचा प्रयत्न केला होता. त्यास मज्जाव केल्यानंतर थोड्या वेळाने तिने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर यांनी दिली. सदर लिफाफा पापडी चर्चच्या धर्मगुरूंनी वेळीच वाचला असता, तर ही घटना टळू शकली असती. मात्र, घटनेनंतर सदरचा लिफाफा तपासण्यात आला. त्यानुसार आत्महत्येची नोंद असल्याने या प्रकरणी चर्चच्या धर्मगुरूंचे जाब जबाब नोंदवले जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीस वसई न्यायालयात हजर केले असता, त्यास शनिवार पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. गुन्हा क्रमांक १२/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १०८, ११५(२), ३५१(३) प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास सपोनि घनदाट करीत आहेत.

**जिल्हा परिषद पालघर**

**अधिसूचना**

क्र. पाजिप/साप्रवि/नियो-१/१२८४ दिनांक : ३०/१२/२०४

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या अधिनियम १६९१चे कलम १४२ अन्वये महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करणे संबंधितचे नियम १९६४ व सुधारित नियम १९६६ व १९८१ च्या अनुषंगाने व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परित्रक क्र. संगणक-१०९५/ सीआर/२९५४/५७ दि. २४ जानेवारी १९९५ द्वारे दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पालघर जिल्हा परिषदेचा सन २०२३-२४ चा वार्षिक प्रशासन अहवाल तयार करण्यात आा आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब असाधारण क्रमांक १५३ ग्रामविकास व जलसंधारण जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेनी दिनांक १३/१२/२०२४ रोजा मान्यता दिली आहे. सदर वार्षिक प्रशासन नियम ९ अन्वये प्रसिद्ध करणेय येत आहे.

सही/-

**भानुदास पालवे (भाप्रसे)**

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद पालघर

# लातूर येथील राजमाता जिजामाता संकुलात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**लातूर/प्रतिनिधी**

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, संगमेश्वर विद्यालय व राजमाता जिजामाता बी.एड. महाविद्यालयात जयंतीनिमित्त क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शुक्रवारी महिला शिक्षिकादिन साजरा करण्यात आला.




अध्यक्षस्थानी संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये होत्या. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे व वैशाली केंद्रे, संस्थेच्या सदस्य स्वाती घुले, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. या निमित्त संकुलातील इयत्ता ५वी ते १०वी मधील विद्यार्थ्यांच्या घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, महात्मा फुले व सावित्रीबाईंनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. बालविवाह, सती, केशवपन अशा कित्येक कुप्रथांना सावित्रीबाईंनी विरोध केला. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसार व समाज सुधारणेच्या कामात व्यतीत केले, असे त्यांनी सांगितले. यावेळी शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पालघर पोलीस दलाकडून 'रस्ता सुरक्षा अभियाना'च्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन!






**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा पोलीस दलाकडून मोटार वाहन अपघातात परिणामकारकरित्या आळा बसावा व नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमाचा प्रचार व प्रसार होण्याकरिता दरवर्षी संपूर्ण भारतात रस्ता सुरक्षा अभियान आयोजित करण्यात येते. केंद्र शासनाच्या निदर्शनानुसार याही वर्षी १ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत ३६वे रस्ता सुरक्षा अभियान साजरा करण्याच्या सूचना करण्यात आल्या. त्या अनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस व जिल्हा वाहतूक शाखा पालघर यांच्या वतीने संपूर्ण महिनाभर रस्ता सुरक्षा अभियान २०२५ राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण जिल्ह्यात वाहतूक नियमाबाबत जनजागृती व्हावी याकरिता वेगवेगळे कार्यक्रम राबवून जनजागृती करण्यात येत आहे.

पालघर जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी बॅनर्स लावणे व महत्त्वाच्या ठिकाणी चौकसभा घेऊन वाहन चालकांना मोटार वाहन कायदा व सुरक्षा करिता वाहने चालवण्याची माहिती देणे. बेकायदेशीर वाहने चालवणे नारे वाहन चालकावर प्रतिबंधक आणण्यासाठी विरुद्ध दिशेने वाहने चालवणाऱ्या हेल्मेट न परिधान करण्यात करता वाहने चालवणे वाहन चालू होता ना मोबाईलवर बोलणारे सिग्नल तोडणारे लायसन नसणारे इसमाविरुद्ध विशेष मोहीम पोलिसांनी राबवून कारवाई केली. शालेय विद्यार्थ्यांचे प्रबोधन रस्ता सुरक्षा विषयी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनींना शाळेत जाऊन प्रबोधन करणे नागरिकांना लायसन्स व परवाने काढण्याबाबत जनजागृती करणे. वाहन चालक व पोलीस अमलदार यांच्यासाठी तान तनाव शिबिराचे आयोजन मोटरसायकल रायडर करणाऱ्या वाहन चालकांना रस्ते सुरक्षा बाबत व ओव्हरटेक स्पीड व इतर वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या वाहन चालकांना वाहतुकीच्या नियमाचे जनजागृती मार्गदर्शन अपघाती जखमी जीव वाचवणे व त्यावर तातडीने उपचार करणे याबाबत मार्गदर्शन जनजागृती महामार्गावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांना तसेच बैलगाडींना रिफ्लेक्टर लावणे मुख्य रस्ता व महामार्गावरील हद्दीतील रुग्णालय स्थानिक पोलीस ठाणे यांच्या दूरध्वनीला क्रमांक आचे बोर्ड लावणे पालघर एसटी बस डेपो येथे वाहन चालकासाठी कार्यशाळा आयोजित करून वाहतूक नियमाची माहिती देऊन वाहतूक नियमाची जनजागृती केली बाईक रॅली काढून वाहतूक नियमाची जनजागृती ही करण्यात आली. रस्ता सुरक्षा अभियान २०२५च्या अनुषंगाने वाहतूक नियमाची जनजागृती व्हावी याकरिता जिल्ह्यात सर्व वाहतूक विभागामधील महत्त्वाचे विना लायसन्स वाहन चालू नये चालवताना मोबाईलचा वापर टाळा वाणा वाहनात मोठा आवाजात गाणे वाजू नका अशा विविध कार्यक्रम राबवण्यात आले पालघर जिल्ह्यातील सर्व वाहतूक विभागातील शाळा महाविद्यालय विद्यार्थ्यांचे रस्ता सुरक्षा या विषयावर शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमाचे मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात आले जिल्ह्यातील पालघर भोईसर विभागातील महत्त्वाचे चौक तसेच सर्व महत्त्वाच्या चौकी या ठिकाणी तीन चाकी रिक्षा डम डम इत्यादी वाहन चालकांची चौक सभा आयोजित करून वाहन चालव चालकांना मोटार वाहन कायदा व सुरक्षा वाहन चालवण्याची माहिती देऊन वाहतूक नियमाची जनजागृती करण्यात येत आहे विनापरवाना व विना हेल्मेट ...पान ६ वर

# प्रजापती ब्रह्मकुमारी शिवानी दिदींचे व्याख्यान



**लातूर/प्रतिनिधी**

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय संस्थेच्या प्रसिद्ध वक्ते ब्रह्मकुमारी शिवानी दिदींचे प्रेरणादायी व्याख्यान उदगीर येथील जि.प. मैदान तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली होती. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहून ब्रह्मकुमारी शिवानी दिदींचे स्वागत केले. या प्रसंगी ब्रह्मकुमारी शिवानी दिदी यांनी आपल्या व्याख्यानात जीवन मूल्यांचे महत्त्व, आध्यात्मिक जागृती आणि आत्मिक शांती या विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थितांना सकारात्मक विचारांचे महत्त्व सांगितले आणि जीवनातील समस्यांना सामोरे जाण्याची शक्ती कशी वाढवायची याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्र्वरीय संस्थेच्या ब्रह्मकुमारी शिवानी दिदी यांची विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी भेट घेऊन लातूर शहर आणि परीसरातील नागरीकांना आपले मार्गदर्शन ऐकता यावे यासाठी आपला वेळ द्यावी अशी विनंती केली.

# लातूरात बांगलादेशी, पाकिस्तानी व रोहिंग्यांची घुसखोरी शोध मोहीम राबविण्याची हिंदुत्व जागर संघटनेची मागणी



**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील धुळे, नांदेड, भोकरदन, मालेगाव, जळगाव येथे बांगलादेशी घुसखोर नागरिक निदर्शनास आले असून पोलीस प्रशासनाने कारवाई केल्याच्या घटना घडत असताना लातूर शहरात व जिल्ह्यात त्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून हिंदुत्व जागर या संघटनेने जिल्हा अधिकारी कार्यालय व पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांना भेट देऊन याबाबत शोध मोहीम राबवावी तसेच घुसखोर नागरिक व त्यांना आश्रय देणाऱ्यावर कडक कारवाई करावी अश्या आशयाचे निवेदन देण्यात आले आहे. घुसखोरांमुळे देशाच्या अखंडतेला धोका निर्माण झाला आहे. मूळ भारतीय नागरिकांचे संविधानिक हक्क अबाधित राखण्याची तसेच सुरक्षेची जिम्मेदारी ही भारत सरकारची व प्रशासनाची आहे. ह्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता, अशा घुसखोरांचा शोध घेणे व त्यांच्यावर कडक कार्यवाही करणे ही काळाची गरज आहे. लातूरात रस्त्याच्या कडेला विविध छोटे व्यवसाय करणाऱ्यांच्या संख्येत भर पडत असुन सातत्याने नविन चेहरे असणारे त्यांची वेशभूषा, बोलीभाषा, भारतीय हिंदी भाषेतील लयाचे अंतर पाहता हे घुसखोर असल्याची शक्यता नाकारता येत नाही शिवाय यांच्याकडे असलेले बनावट कागदपत्रे याचीही कसुन ...पान ६ वर

# सरपंच हत्येच्या निषेधार्थ ग्रामपंचायतीचे कामकाज बंद



**वाडा/प्रतिनिधी**

बीड जिल्हातील मस्साजोग ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याप्रकरणी त्यांना न्याय मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेने पुकारलेल्या बंदला अबिटघर ग्रामपंचायतच्या सरपंच साक्षी साठे यांनी प्रतिसाद देऊन ग्रामपंचायत कार्यालयात संतोष देशमुख या मृत्युमुखी पडलेल्या सरपंचांना श्रद्धांजली वाहिली व त्या घटनेचा निषेध व्यक्त करून गुरुवारी (दि.९) अत्यावश्यक सेवा वगळता बाकी पूर्णपणे कार्यालय बंद ठेवून सरपंच संघटनेने पुकारलेल्या बंदला प्रतिसाद दिला.या निषेध आंदोलनावेळी ग्रामपंचायत कर्मचारी तसेच सदस्य कुलदीप पाटील, सुरेश बोचल, उपसरपंच सुप्रिया पाटील व इतर सर्व सन्माननीय सदस्य यांनी बंदला सहकार्य केले.

# रोटरीच्या चित्रकला स्पर्धेचे बक्षिस वितरण



**लातूर/प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ मिडटाऊनच्या वतीने घेण्यात आलेल्या भव्य चित्रकला स्पर्धाचे बक्षीस वितरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आयोजित कार्यक्रमात संपन्न झाले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य अविनाश सातपुते, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी एस.व्ही.क्षिरसागर, माजी प्रांतपाल डॉ. हरिप्रसाद सोमानी हे उपस्थित होते. डिसेंबर महिन्यात झालेल्या या स्पर्धेत शहर व जिल्ह्यातील १५० शाळांनी सहभाग नोंदवला होता. साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी स्पर्धेत चित्रे रेखाटली. यातील विजेत्यांना प्रायोजक कुणाल सायकल वर्ल्ड यांच्या मार्फत एकूण १२ सायकली बक्षीस म्हणून दिल्या गेल्या. त्यात पहिली ते दहावीच्या वर्गासाठी प्रत्येकी एक व मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी दोन सायकल देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षण हेच जीवनात अंतिम नाही, ते गरजेचे तर आहेच पण ५९ कलापैकी एखादी कला करा असे प्रतिपादन माजी पंतप्रधान डॉ.हरिप्रसाद सोमाणी अध्यक्षीय समारोप करताना केले. चित्रकलेमध्ये पुढे जाऊन करिअरच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यावसायिक संधी याबद्दल प्राचार्य अविनाश सातपुते यांनी मार्गदर्शन केले. एस.व्ही. क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रमांकासाठी स्पर्धा न घेता त्यांच्या ...पान ६ वर

# वाडा येथे 'रेझिंग डे' निमित्त पोलिसांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**वाडा/प्रतिनिधी**

मागील काही काळात तरुणींनी केलेल्या आत्महत्या, अमिषाला बळी पडून अल्पवयीन असताना पळून जाऊन लग्न करणे, माता होने असे प्रकार निव्वळ कायद्याची योग्य माहिती नसल्यामुळे होत असतात यासाठी जनसंवाद अभियान अंतर्गत रेझिंग डे च्या निमिताने गुरुकुल ग्लोबल स्कुलच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनाचा सदुपयोग करून विद्यार्थिनींनी निर्भीडपणे पोलिसां सोबत संवाद साधावा असे आवाहन वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी केले. ते पुढे म्हणाले की शिक्षणाचा ध्यास मनी बाळगून अभ्यास करा, व्यसनांपासून दूर रहा, शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती करा, काही अडचणी उद्भवल्या तर महिला पोलिसांशी संपर्क करा. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून जनसंवाद अभियान राबविण्यात येत असून सध्या महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त रेझिंग डे साजरा केला जात आहे. त्या अनुषंगाने वाडा तालुक्यातील हरोसाळ येथील गुरुकुल ग्लोबल स्कुल येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात बालकांचे हक्क, अधिकार, मुलींबाबातचे कायदे, वाहतूक कायदे ...पान ६ वर

## 'वसई-विरार महानगर पत्रकार संघां'तर्फे पत्रकार दिन समारंभ संपन्न

# प्रत्येक समाजघटकाला सत्याचा सामना करण्यासाठी सज्ज करणारे पत्रकार हे देशाचे खरे मार्गदर्शक - रेमंड मच्याडो





**वसई/प्रतिनिधी**

सत्यासाठी लढण्याचा, लोकशाही आणि सामाजिक न्यायासाठी आवाज उठवण्याचा आणि स्वतंत्रतेसोबत येणाऱ्या जबाबदारीची जाणीव ठेवण्याचा पत्रकारिता हा एक महत्त्वाचा धडा आहे. पत्रकारिता हे केवळ एक व्यावसायिक कार्य नसून, समाजाचे प्रबोधन करणारे आणि विचारसरणीला चालना देणारे खूप महत्त्वाचे माध्यम आहे. आज आपण केवळ आद्य पत्रकार स्व. बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करत नाही, तर पत्रकारितेच्या उज्ज्वल परंपरेला सलाम करत आहोत. समाजातील प्रत्येक घटकाला सत्याचा सामना करण्यासाठी सज्ज करणारे पत्रकार हे आपल्या देशाचे खरे मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक, तथा मुक्त पत्रकार रेमंड मच्याडो यांनी केले. आद्यपत्रकार, तथा दर्पणकार स्व. बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती, तसेच यंदाचा 'पत्रकार दिन' समारंभ 'वसई-विरार महानगर पत्रकार संघ' आणि 'मदर वेलंकनी शिक्षण संस्थे'च्या संयुक्त विद्यमाने सोमवारी, दि. ६ जानेवारी २०२५ रोजी मदर वेलंकनी शिक्षण संस्था, महेश पार्क, तुळींज रोड, नालासोपारा (पुर्व) येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात वसईतील ज्येष्ठ लेखक, तथा सामाजिक कार्यकर्ते रेमंड मच्याडो अध्यक्ष म्हणून बोलत होते. मच्याडो यांचा अमृतमहोत्सवी सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी मुख्य अतिथी म्हणून पालघरचे खासदार डॉ. हेमंत सावरा, तर प्रमुख पाहुणे म्हणून नालासोपारा विधानसभेचे आमदार राजन नाईक उपस्थित होते. तर वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित व माजी आमदार क्षितीज ठाकूर यांनी विशेष अतिथी म्हणून सहभाग घेतला. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली.

खासदार डॉ. सवरा यावेळी म्हणाले की, समाजाला दिशा देणे व प्रगल्भ समाजाची निर्मिती करणे यासाठी पत्रकारांना खूप मोठी जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. लोकतंत्र शाबूत ठेवण्याचे काम, तसेच समाजात घडत असलेल्या चुकीच्या गोष्टींच्या वर्मावर बोट ठेवण्याचे काम पत्रकार करतात. त्यावर आवाज उठवतात. त्यामुळेच पत्रकारांना सुरक्षिततेची गरज भासते. यासाठी सरकारने कडक कायदे बनवले आहेत. अनेक योजना पत्रकारांसाठी शासनाने सुरू ...पान ६ वर

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिकाधिक पत्रकारिता व्हावी -तानाजी घोलप




**लातूर/प्रतिनिधी**

सध्या एआयच्या माध्यमातून पत्रकारीता सुरू झाली आहे. पुढे ती वाढणार आहे. सध्या या अधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक वापर होत असून त्याचा आपणाला स्विकार करून यापुढे आपणही त्याच्याशी जोडले गेलो पाहिजे. ज्यांनी एआयची पत्रकारीता स्विकारली आहे. ते आज पुढे आहेत. त्यामुळे अचूक, अद्यावत, अधिक प्रभावी पत्रकारीता करण्यासाठी भविष्यात अधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिकाधिक पत्रकारिता व्हावी, असे प्रतिपादन जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांनी केले. अद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस अभिवादन व व्हाईस ऑफ मिडीया, लातूर जिल्हयाच्यावतीने दर्पण दिनानिमीत्त पुरस्कार व पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राच्या वितरण प्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप बोलत होते. यावेळी व्हॉईस ऑफ मिडीयाचे जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, जिल्हा कार्याध्यक्ष शहाजी पवार, दीपरत्न निलंगेकर, सरचिटणीस बालाजी फड आदींची प्रमुख उपस्थिती होती. अद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या पत्रकारीतेपासून आज पर्यंत पत्रकारीतेत अमुलाग्र बदल घडत आले आहेत. सध्याचे युग हे स्पर्धेचे असून प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा सुरू असल्याचे सांगून घोलप म्हणाले की, शासनाच्या योजनेचा लाभ आपल्याला देण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत. व्हॉईस ऑफ मिडीच्या माध्यमातून आपल्या पत्रकार ...पान ६ वर

# वसई-विरारमध्ये लायन्स क्लब आणि पोलिसांची रस्ते सुरक्षेसाठी भव्य रॅली

**विरार/प्रतिनिधी**

लायन्स इंटरनॅशनल, डिस्ट्रिक्ट ३२३१-३, क्या ग्रामीण सेवा सप्ताहच्या अंतर्गत ट्रॅफिक आणि रस्ते सुरक्षेविषयी जागरूकतेसाठी, मीरा भाईंदर वसई-विरार आयुक्तालयाच्या वसई विरारच्या ट्रॅफिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने एका भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. धावपळीच्या जीवनशैलीमध्ये मोठ्या प्रमाणात अपघात होत आहे त्यातच चालकांचा निष्काळजीपणा व ट्रॅफिकचे नियम न पाळल्याने होणारे अपघातांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अपघातामुळे कुटुंब उद्ध्वस्त होतात व पोलीस खात्यावर व समाजावर पडणारा ताण वाढतो तो वेगळाच, या दृष्टीने विचार करून सामाजिक क्षेत्रामध्ये सेवेमध्ये




अव्वल असणारी जागतिक सर्वात मोठे संघटनेच्या डिस्ट्रिक्ट ३२३१अ३ च्या वतीने व मीरा-भाईंदर आयुक्तालय च्या वसई विरार विभागाने संयुक्तरीत्या एक जागरूकता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या यादीमध्ये अनेक संस्थांनी आपला सहभाग नोंदवला यामध्ये एनएसएसचे स्टुडन्ट सदस्य राष्ट्रीय सैनिक संस्थेचे सदस्य व तसेच अनेक संस्थांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला. ट्रफिकचे सिनियर पोलीस निरीक्षक श्री महेश शेट्ये यांच्या विशेष सहयोगाने व डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन लायन राहुल रस्तोगी व लायन श्रद्धा मोरे, जिसटी हेड लायन प्रीती सोढा, इतर लायन मेंबर्स लायन हनुमंत भोसले, भावेश धनेचा, भारती पवार, अतुल दांडेकर, नितीन पुरकर, निनाद म्हात्रे, ...पान ६ वर